
# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

## ई वार्ता

मार्च २०२४




मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र.२७२४/२०२४

मफुकृवि ई वार्ता
मार्च २०२४

वर्ष :४, अंक क्रं. : ३९, मार्च, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## फुले अमृतकाळ तापमान आर्द्रता निर्देशांक आधारित पशु सल्ला ॲपचे उदघाटन





**दि. ७ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रातर्फे फुले अमृतकाळ – तापमान आर्द्रता निर्देशांक आधारित पशु सल्ला ॲपचे उद्घाटन मुंबई येथे मंत्रालयात राज्याचे कृषि मंत्री मा. ना. श्री. धनंजय मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्यास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील, मा. आमदार श्री. संग्राम जगताप, मा. आमदार श्री. बाळासाहेब आसबे, राज्याचे अपर कृषि सचिव श्री. अनूप कुमार तसेच कृषि आयुक्त श्री. प्रविण गेडाम हे उपस्थित होते.

या ॲपद्वारे विविध ऋतूतील, विशेषतः उन्हाळ्यातील, जास्त तापमानाचा गाई आणि म्हशी वर येणारा ताण आपल्याला समजणार आहे. ओपन सोर्स माहितीच्या आधारे व सेन्सर्सच्या मदतीने या ॲपने आपण जगभरातील कुठल्याही स्थळाचे तापमान आद्रता निर्देशांक (THI) याची माहिती मिळवून जास्त किंवा कमी तापमान निर्देशांक असल्यास जनावरांची घ्यावयाची काळजी व सल्ला लगेचच मिळणार आहे. बदलत्या वातावरणामुळे जनावरांवरील येणारा ताण व त्यामुळे कमी होणारे दूध उत्पादन या ॲपद्वारे दिले गेलेले सल्ले वेळीच अमलात आणून रोखता येईल.

या वेळी बोलताना कृषि मंत्री मा.ना. श्री. धनंजय मुंडे म्हणाले की सदर ॲप हे बदलत्या वातावरणात सगळ्यात महत्त्वाची उपलब्धी असून, जनावरांना होणाऱ्या उष्माघातामुळे दूध उत्पादनात होणारी मोठी घट या ॲपच्या वापरामुळे कमी होण्यास मदत होईल. तसेच विद्यापीठाने देखील सदर अद्ययावत ॲप शेतकऱ्यांना सहज उपलब्ध होऊन नियमित वापरता येण्यासाठी सर्वत्र पोहचविण्याची तयारी करावी असेही नमूद केले. वातावरणीय बदलामुळे पावसाने दिलेली ओढ, अतिवृष्टी, ढगफुटी, वाढते तापमान, उष्माघात व पावसाचा अकल्पित लहरीपणा अशा गोष्टी वारंवार घडत आहेत. त्यामुळे पशुधनास चारा व पाणी पुरविण्यावर आणि पशुधनाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. संकरित गाई व म्हशींमध्ये दुग्ध उत्पादनावर विपरित परिणाम होतो. दुभत्या गाईचे दूध उत्पादन ५ ते २० टक्क्यांपर्यंत घटल्याचे आढळून आले आहे. या आव्हानांवर मात करण्यासाठी हे ॲप महत्त्वाची भूमिका बजावेल. देशी गाय संशोधन केंद्राचे गो संवर्धनाचे कार्य प्रशंसनीय असल्याचा उल्लेख ही त्यांनी केला. विद्यापीठाने तयार केलेले ॲप हे पशुपालकांसाठी अत्यंत उपयोगी असल्याचे नमूद करून त्यांनी सर्व शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले.

उद्घाटनानिमित या विषयावर आधारित तयार केलेली छोटी चित्रफित तसेच तसेच फुले अमृतकाळ ॲपच्या लोगोचे देखील अनावरण करण्यात आले. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी विद्यापीठाने विकसित केलेले तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या उपयोगी पडत असून उत्पादनात वाढ होण्यास मदत होत आहे असे नमूद केले. कृषि सचिव श्री. अनूप कुमार म्हणाले की सदर ॲपचा उपयोग विदर्भ आणि मराठवाडा अशा उष्ण भागात पशूपालकांसाठी चांगला होवू शकतो. याप्रसंगी ॲपचे तांत्रिक सादरीकरण डॉ सोमनाथ माने, प्रमुख शास्त्रज्ञ, देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. याप्रसंगी पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. सुनील मासळकर, प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने, तांत्रिक प्रमुख डॉ.धीरज कंखरे, विद्यापीठाचे शास्त्रज्ञ डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके, डॉ संतोष मोरे, तंत्रज्ञ श्री. अभयसिंह जगताप व श्री. श्रीकृष्ण मुळे उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे कृषि यांत्रिकीकरण दिवस साजरा





**दि. ५ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या राजर्षि छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या अखिल भारतीय समन्वित कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प, रा. छ. शा. म. कृषि महविद्यालय, कोल्हापूर, कृषि विभाग, कोल्हापूर आणि कृषि अवजारे उत्पादक संघटना (महाराष्ट्र) यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि यांत्रिकीकरण दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष मा.आ.श्री. प्रकाश आबिटकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे सदस्य श्री. दत्तात्रय उगले, संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार,कृषि विभागाचे सहसंचालक श्री. बसवराज बिराजदार, कृषि यंत्रे व शक्ती विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. अरुण भिंगारदिवे, रामेतीचे प्राचार्य श्री. उमेश पाटील, कार्यक्रमाचे आयोजक व महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, अ.भा.स. कृषि यंत्रे व अवजारे सुधार प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. तुळशीदास बास्टेवाड, तामिळनाडू राज्याच्या कृषि अभियांत्रिकी विभागाचे मुख्य अभियंता डॉ. आर. मुरुगेसन, डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके व महाराष्ट्र कृषि अवजारे उत्पादक संघटनेचे अध्यक्ष श्री. भरत पाटील उपस्थित होते.

यावेळी आधुनिक कृषि यंत्रे व अवजारे प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र कृषि अवजारे उत्पादक संघटनेचे सचिव श्री. संजय जाधव यांच्यासह महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. शैलेंद्र कांबळे, पशुविज्ञान व दुग्धशास्त्र विभागप्रमुख डॉ. शिवाजीराव पाचपुते, उद्यानविद्या विभागप्रमुख डॉ. संग्राम धुमाळ, विस्तारशिक्षण विभागप्रमुख डॉ. भारत कोलगणे, कृषि अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. मोहन जाधव, कृषि विद्या विभागप्रमुख डॉ. रेणुका शिंदे, वनस्पती रोगशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुनीता वाघमारे यांच्यासह शेतकरी, विद्यार्थी, अभियंते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनीषा मोटे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. साताप्पा खरबडे यांनी केले.

वर्ष :४, अंक क्रं. : ३९, मार्च, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता
मार्च २०२४

वर्ष :४, अंक क्रं. : ३९, मार्च, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कृषि विद्यापीठ आपल्या दारी या उपक्रमांतर्गत शेतकरी परिसंवाद संपन्न





**दि. ७ मार्च,२०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या संकल्पनेतून कृषि विद्यापीठ आपल्या दारी या उपक्रमांतर्गत महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि भारतीय हवामान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण कृषि मोसम सेवा अंतर्गत हवामान बदल व त्या आधारित शेती व्यवस्थापन व शेतकरी जागरूकता परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठ कार्यकारी परिषद सदस्य आणि मा.आ.श्री. प्राजक्तदादा तनपुरे, प्रमुख पाहुणे म्हणून कृषिभूषण श्री. संजीव माने उपस्थित होते. याप्रसंगी विद्यापीठाचे संचालक संशोधन डॉ. सुनील गोरंटीवार कृषिविद्या विभाग प्रमुख. डॉ. आनंद सोळंके, आंतरविद्या शाखा जलसिंचन विभाग प्रमुख डॉ. महानंद माने, ग्रामीण कृषि मोसम सेवाचे समन्वयक डॉ. रवी आंधळे, कृषिभूषण श्री. सुरसिंग पवार उपस्थित होते.

यावेळी आमदार श्री. प्राजक्तदादा तनपुरे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की विद्यापीठ प्रकल्पग्रस्त गावातील शेतकऱ्यांसाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने कृषि विद्यापीठ आपल्या दारी उपक्रम सुरू केला आहे. हा उपक्रम अतिशय कौतुकास्पद आहे. या उपक्रमाद्वारे शेतकऱ्यांना विद्यापीठाने विकसित केलेले नवीन तंत्रज्ञान जाणून घेण्यास मदत होईल. सर्व शेतकऱ्यांनी या उपक्रमाचा फायदा घ्यावा. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शन करताना श्री. संजीव माने म्हणाले खोडवा उसाचे भरघोस उत्पादन घ्यायचे असेल तर पाचट पेटू नका, त्याची कुट्टी करू नका, पाचट सरी आड करा, बुडखे जमिनीलगत छाटा, ऊसाच्या वाढीच्या काळात त्याच्या शेंडेला इजा पोहचू देऊ नका, खोडवा उसाच्या मुळांचा जारवा तोडू नका, मुख्य व दुय्यम अन्नद्रव्य पहारीच्या सह्याने द्या, सूक्ष्म अन्नद्रव्य चिलेटेड स्वरुपात द्या. या सूत्रांचा वापर केल्यास खोडव्याचे उत्पादन एकरी १० ते १५ टनाने निश्चित वाढते. मला हे ज्ञान कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञ यांच्या संपर्कात आल्यानंतर मिळाले.कृषि विद्यापीठ हे तुमच्या हाकेच्या अंतरावर असल्याने तुम्ही फार नशीबवान आहात. तुम्ही नेहमी शास्त्रज्ञांच्या संपर्क असणे गरजेचे आहे.मी माझे उसाचे उत्पादन एकरी २२ टना पासून ते आज १५० टनापर्यंत नेले आहे. हे सर्व कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या संपर्कात आल्यामुळे शक्य झाले आहे.

यावेळी संचालक संशोधन डॉ. सुनील गोरंटीवार मार्गदर्शन करताना म्हणाले कृषि विद्यापीठ आपल्या दारी या उपक्रमाचा प्रकल्पग्रस्त गावांनी जास्तीत–जास्त फायदा घ्यावा. कृषि विद्यापीठ प्रकल्पग्रस्त गावांमध्ये ड्रोनद्वारे पिकांवर फवारणी कशी करायची यासंदर्भात प्रात्यक्षिके घेण्यात येतील. याप्रसंगी डॉ. अनिल दुरगुडे यांनी जमिनीची सुपिकता यावर तर इफकोचे क्षेत्र प्रतिनिधी श्री. वैभव ढेपे यांनी नॅनो यूरिया यावर शेतकऱ्याना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. आनंद सोळंके यांनी केले तर स्वागत व आभार डॉ. महानंद माने यांनी मानले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शेतकऱ्यांना कृषिदर्शनी–२०२४ आणि मफुकृवि कॅलेंडरचे वाटप करण्यात आले. या परिसंवादामध्ये श्री. सचिन भिंगारदे. श्री. प्रकाश भोंडे, श्री. सचिन शेटे, श्री. नवनाथ ढगे उपस्थित होते. याप्रसंगी. खडांबे, सडे, राहुरी खुर्द, गोटुंबे आखाडा, वरवंडी या कृषि विद्यापीठ प्रकल्पग्रस्त गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मफुकृवि ई वार्ता
मार्च २०२४

वर्ष :४, अंक क्रं. : ३९, मार्च, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या हस्ते एलसी–एमएस या उपकरणाचे उद्‌घाटन





**दि. २७ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या अथक प्रयत्नामुळे विद्यापीठातील किटकशास्त्र विभागाच्या किडनाशक अंश विश्लेषण प्रयोगशाळेस एलसी–एमएस/एमएस हे उपकरण मिळाले आहे. राज्यातील चारही कृषि विद्यापीठांपैकी फक्त महात्मा फुले कृषि विद्यापीठातील किटकशास्त्र विभागामध्ये अखिल भारतीय किडनाशक अंश पृथःकरण योजना कार्यरत आहे. या प्रयोगशाळेला एन.ए.बी.एल.चे नामांकण प्राप्त आहे. या योजनेला भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचा ७५ टक्के अर्थसहाय्य व महाराष्ट्र शासनाचे २५ टक्के अर्थसहाय्यातून किडनाशक अंश विश्लेषण प्रयोगशाळेस एलसी–एमएस/एमएस हे उपकरण खरेदी केले आहे. या उपकरणाची पाहणी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी नुकतीच प्रयोगशाळेला भेट देवून या उपकरणाचे उद्‌घाटन केले. यावेळी संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार, अधिष्ठाता डॉ. श्रीमंत रणपिसे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. सी.एस. पाटील, कुलसचिव श्री. अरुण आनंदकर, नियंत्रक श्री. सदाशिव पाटील, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विठ्ठल शिर्के, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, किटकशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. साताप्पा खरबडे, अधिदान व लेखा अधिकारी श्री. सुर्यकांत शेजवळ, किडनाशक अंश विश्लेषण प्रयोगशाळेचे डॉ. भाई देवरे व डॉ. योगेश सैंदाणे उपस्थित होते.

यावेळी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील उद्‌घाटन करतांना म्हणाले या उपकरणामुळे किडनाशक अंश विश्लेषण प्रयोगशाळेची गुणवत्ता, अचुकता व विश्वासाहर्ता वाढली आहे. या विभागाच्या विद्यार्थ्यांनी या प्रयोगशाळेतील संशोधनावर आधारीत लेख नासरेटेड जर्नलमध्ये प्रसिध्द करावेत. याप्रसंगी डॉ. सी.एस. पाटील यांनी या उपकरणाविषयी माहिती देतांना सांगितले की भाकृअपद्वारे पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यातून विविध फळे व भाजीपाला यांचे नमुने गोळा करुन या उपकरणाद्वारे त्यामधील किडनाशके, बुरशीनाशके व तणनाशके यांच्या अवशेषांची पडताळणी केली जाणार आहे. या उपकरणाद्वारे एका नमुन्यातून एकुण २०० पेक्षा जास्त किटकनाशकांची तपासणी करणे शक्य होणार आहे. किटकशास्त्र विभागातील सदरची प्रयोगशाळा ही पश्चिम महाराष्ट्रातील एकमेव प्रयोगशाळा असून जीला एन.ए.बी.एल.चे नामांकन मिळालेले असल्याचे डॉ. पाटील यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते पीक संरक्षणाच्या शिफारशी, एम.एस्सी व आचार्य पदवीच्या विद्यार्थ्यांच्या संशोधनावर आधारीत कॉम्पोंडीयम या पुस्तिकांचे विमोचन करण्यात आले. या कार्यक्राचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. सी.एस. पाटील यांनी केले तर आभार डॉ. भाई देवरे यांनी मानले.

## जिल्ह्यातील ध्वजनिधी संकलनात महात्मा फुले कृषि विद्यापीठ अग्रस्थानी

**दि. २८ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ध्वजनिधी संकलनामध्ये विद्यापीठाने निधी संकलनाच्या उद्दिष्ठापेक्षा १२१ टक्के जास्त ध्वजनिधी संकलीत करुन जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक मिळविला. यावर्षीचा विद्यापीठात संकलन केलेला ध्वजनिधी रु. १८,४३,७८३/– चा धनादेश महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी



अहमदनगरचे जिल्हाधिकारी श्री. सिध्दराम सालीमठ यांना सुपुर्त केला. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. श्रीमंत रणपिसे, कुलसचिव श्री. अरुण आनंदकर, नियंत्रक श्री. सदाशिव पाटील व पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विठ्ठल शिर्के उपस्थित होते. यावेळी ध्वजनिधी संकलनाच्या उत्कृष्ट कार्याबद्दल जिल्हाधिकाऱ्यांनी स्मृतीचिन्ह देवून विद्यापीठाचा गौरव केला.

## २० वी विस्तार शिक्षण परिषद बैठक संपन्न



**दि. १३ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठात २० व्या विस्तार शिक्षण परिषद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील होते. यावेळी संशोधन संचालक डॉ. सुनिल गोरंटीवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. चिदानंद पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीमंत रणपिसे, कुलसचिव डॉ. विठ्ठल शिर्के, नियंत्रक श्री. सदाशीव पाटील, विस्तार शिक्षण परिषदेचे तज्ञ शेतकरी सदस्य श्री. भाऊसाहेब जाधव, श्री. समाधान पाटील, श्री. सर्जेराव पाटील, श्री. बाळासाहेब आढाव उपस्थित होते.

याप्रसंगी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना म्हणाले की शेतीमधील निविष्ठांचे दर दिवसेंदिवस वाढत आहे. शेतकऱ्यांनी गट स्थापन करुन या गटाद्वारे कृषि निविष्ठा मोठ्या प्रमाणात खरेदी केल्यास त्यांना कृषि निविष्ठा या सवलतीच्या दरात मिळतील. शेतकऱ्यांनी शेतीला दुग्धव्यवसायाची जोड द्यावी व जनावरांपासून मिळणाऱ्या सेंद्रिय खतांचा वापर जमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी करावा. कृषि निविष्ठांची सवलतीच्या दरात खरेदी व कृषि उत्पादनांची योग्य भावात विक्री करायची असेल तर फायदेशीर शेतीसाठी गटशेती हा उत्तम पर्याय आहे. याप्रसंगी शेतकरी सदस्य श्री. सर्जेराव पाटील म्हणाले की कृषि विद्यापीठाचे संशोधन हे उच्च दर्जाचे असून विद्यापीठाचे विविध पिकांचे वाण हे भरघोस उत्पादन देणारे आहे. श्री. भाऊसाहेब जाधव यांनी ॲव्हाकॅडो, खजुर यासारख्या नविन पिकांवर संशोधन होण्याची गरज व्यक्त केली. श्री. समाधान पाटील यांनी कपाशीवरील किड नियंत्रणावर अधिक संशोधन होण्याची गरज व्यक्त केली. श्री. बाळासाहेब आढाव यांनी विद्यापीठात सुरु असलेल्या नवनविन उपक्रमांबाबत तसेच संशोधनाबाबत समाधान व्यक्त केले.

यावेळी डॉ. चिदानंद पाटील यांनी १९ व्या विस्तार शिक्षण परिषदेचा इतिवृत्तांत आणि विस्तार शिक्षण उपक्रम अहवाल सादर केला. याप्रसंगी डॉ. सुनिल गोरंटीवार, डॉ. श्रीमंत रणपिसे, डॉ. विठ्ठल शिर्के यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. पंडित खर्डे तर सदस्यांची ओळख डॉ. भगवान देशमुख यांनी करुन दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सचिन सदाफळ तर आभार डॉ. गोकुळ वामन यांनी मानले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात माती व पाणी परिक्षण प्रशिक्षण संपन्न






**दि. १५ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील मृदविज्ञान विभागामार्फत माती व पाणी परिक्षण प्रशिक्षण कार्यक्रम दि. ११ ते १५ मार्च, २०२४ या कालावधीत आयोजीत करण्यात आला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगीच्या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील होते. यावेळी मृदविज्ञान विभाग प्रमुख डॉ. बी.एम. कांबळे, डॉ. महाविरसींग चौहान, डॉ. अनिल दुरगुडे, डॉ. विजय पाटील व प्रशिक्षणाचे समन्वयक डॉ. गणेश शेळके उपस्थित होते. यावेळी कुलगरु डॉ. पी.जी. पाटील आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात म्हणाले की माती व पाणी हे शेतीमधील महत्वाचे घटक आहेत. परंतु रासायनिक खतांचा असंतुलीत तसेच अतिवापर यामुळे माती व पाण्याचे आरोग्य मोठ्या प्रमाणात खराब झाले आहे. याचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर होत आहे. शेतकऱ्यांनी माती व पाणी परिक्षण करुनच खतांचा संतुलीत वापर करण्यावर भर दिला पाहिजे. जेणेकरुन मातीचे आरोग्य सुधारण्यासाठी मदत होईल व पर्यायाने आपलेही आरोग्य चांगले राहिल. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बी.एम. कांबळे यांनी प्रशिक्षणाचा आढावा सादर केला. यावेळी नाशिक येथील जिल्हा सर्वेक्षण अधिकारी श्री. संदिप वळवी व श्रीमती अर्चना संकपाळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार डॉ. गणेश शेळके यांनी तर सूत्रसंचालन कु. सायली बिरादार यांनी केले. या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील मृदा सर्वेक्षण व मृदा चाचणी अधिकारी/कर्मचारी, महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कर्मचारी, खाजगी माती परिक्षण प्रयोगशाळा यांचे अधिकारी व कर्मचारी असे एकुण २२ प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदवला.

## गहू पिकाच्या जर्मप्लाझम प्रकल्पास कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांची भेट

**दि. १५ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील प्रक्षेत्रावर गहु पिकातील जर्मप्लाझम प्रकल्पास महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी भेट देवून पाहणी केली. यावेळी कुलसचिव श्री. अरुण आनंदकर, नियंत्रक श्री. सदाशिव पाटील, उत्तर प्रदेश कृषि संस्थेचे माजी महासंचालक डॉ. राजेंद्र कुमार, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे शास्त्रज्ञ डॉ. अमित कुमार, कृषि विस्तार विभाग प्रमुख डॉ. विठ्ठल शिर्के, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजू अमोलिक, कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे, कुलगुरुंचे तांत्रिक अधिकारी डॉ. पवन कुलवाल, गहु पैदासकार डॉ. सुरेश दोडके व डॉ. सुनिल कदम उपस्थित होते. यावेळी या प्रकल्पाचे प्रमुख अन्वेषक डॉ. पवन कुलवाल व सह अन्वेषक डॉ. सुरेश दोडके यांनी या प्रकल्पाबद्दल माहिती देताना सांगितले की या प्रयोगामध्ये गहू पिकाचे एकुण ६६० जर्मप्लाझम लावण्यात आले असून जिनोमिक्स तंत्रज्ञानाच्या सहाय्याने या जर्मप्लाझममधील हवामानासंबंधीची

वर्ष :४, अंक क्रं. : ३९, मार्च, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी







लवचीकता, उत्पादकता व पौस्टिक गुणवत्ता सुधारण्यासाठी हा प्रयोग करण्यात येत आहे. या प्रयोगातून अधिक उष्णतेला सहनशील असणारे व उशिरा पेरणीसाठी उपयुक्त ठरणारे वाण संशोधित करणे सोपे होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव येथे शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक संपन्न





**दि. २५ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या सातारा जिल्ह्यातील कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव येथे शास्त्रीय सल्लागार समिती बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील होते. याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. सी. एस. पाटील, कोल्हापूर येथील सहयोगी संशोधन संचालक डॉ. अशोक पिसाळ, पाडेगाव येथील मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्राचे ऊस विशेषज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे व बोरगाव कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. महेश बाबर उपस्थित होते. या बैठकीस अटारी पुणे येथील शास्त्रज्ञ डॉ. तुषार

वर्ष :४, अंक क्रं. : ३९, मार्च, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

आठरे हे ऑनलाइन पद्धतीने उपस्थित होते. यावेळी कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की सिंचनाखालील क्षेत्रात वाढ होण्यासाठी शेतकऱ्यांनी जलसंधारणावर भर देणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनी आपले उत्पन्न वाढविण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे. विद्यापीठाने संशोधित केलेल्या नवनवीन शेती पद्धतींचा अवलंब जर आपल्या शेतीमध्ये केला तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त होईल.

दरवर्षी कृषि विज्ञान केंद्रांमध्ये होणाऱ्या उपक्रमांचा आढावा घेऊन पुढील वर्षी करावयाच्या नियोजित कामकाजाची दिशा ठरविण्यासाठी शास्त्रीय सल्लागार समिती बैठकीचे आयोजन करण्यात येत असते. यामध्ये विद्यापीठ स्तरावरील तसेच जिल्हास्तरावरील कृषि व कृषि संलग्न विविध विभागातील तज्ञ सहभागी होऊन केंद्राच्या प्रभावी वाटचालीसाठी मार्गदर्शन व सूचना देत असतात. या बैठकीमध्ये झालेल्या कार्यक्रमांमध्ये डॉ. सी. एस. पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये पिकावरील कीड रोग व्यवस्थापनासाठी एकात्मिक कीड रोग नियंत्रण पद्धतींचा अवलंब करून उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करावे असे सांगितले. याप्रसंगी रब्बी पिकातील कीड रोगांचे नियंत्रण या प्रकाशानाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सातारा जिल्ह्यातील प्रगतशील व पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांचा कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या बैठकीमध्ये डॉ. महेश बाबर यांनी कृषि विज्ञान केंद्राच्या गतवर्षातील कार्याचा अहवाल सादर केला. या बैठकीसाठी कृषि संशोधन केंद्र, कराड, प्रकल्प संचालक, आत्मा, जिल्हा अग्रणी बँकेचे प्रबंधक, सातारा जिल्ह्यातील कृषि विभागाचे अधिकारी व प्रगतशील शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सागर सकटे यांनी तर आभार श्री. संग्राम पाटील यांनी मानले.

## कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे शुभहस्ते पारितोषिक वितरण समारंभ संपन्न





**दि. २१ मार्च, २०२४.** श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालय व कृषि महाविद्यालय, फलटणचा वार्षिक पारितोषिक वितरण व वार्षिक स्नेहसंमेलन समारंभ उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फलटण एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी श्री. श्रीमंत संजिवराजे नाईक निंबाळकर उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयीन समितीचे व्हाईस चेअरमन श्री. शरदराव रणवरे, सदस्य श्री. आर. एच. पवार, श्री. अनिलराव घोरपडे, श्री. रणजित निंबाळकर, फलटण एज्युकेशन सोसायटीचे प्रशासन अधिकारी श्री. अरविंद निकम, श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालय, फलटणचे प्राचार्य डॉ. एस. डी. निंबाळकर, कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यु. डी. चव्हाण, मालोजीराजे शेती विद्यालयाचे प्राचार्य श्री. ज्ञानेश्वर कोळेकर, तंत्रनिकेतन विद्यालयाचे प्राचार्य श्री. माने व मुधोजी हायस्कूलचे प्राचार्य श्री. गंगावणे कार्यक्रमाला उपस्थित होते. कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी मार्गदर्शन करताना पारितोषिक मिळालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा व्यक्त केल्या तसेच युवा पिढीसाठी असणारे विचार मंथन व समायोजन, करीयरमधील व भविष्यातील विचार विनिमय, बदलत्या विश्वानुसार असणाऱ्या कृषि संबधित भविष्यातील संधी, महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचे प्रशासनातील व कृषि व्यवसायातील यशाची वाटचाल, उद्यानशास्त्र व कृषिशास्त्राचे महत्व व आधुनिक काळातील संधी, सध्याचे जागतिक तापमान बदलाचे आवाहन, कृषितील कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रयोग आणि विद्यार्थी जीवनातील स्वावलंबी शिक्षण या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. श्रीमंत संजिवराजे नाईक निंबाळकर यांनी यावेळी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस. डी. निंबाळकर यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. यु.डी.

वर्ष :४, अंक क्रं. : ३९, मार्च, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

चव्हाण यांनी केली. डॉ. यु.डी. चव्हाण यांनी लिहिलेल्या वस्तूनिष्ठ प्रश्नसंच अन्न तंत्रज्ञान या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान प्रशिक्षणाचे आयोजन





**दि. १८ ते २२ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागाच्या वतीने दि. १८ ते २२ मार्च, २०२४ या कालावधीत बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. श्रीमंत रणपिसे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. सी.एस. पाटील, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, कृषिविद्या विभाग प्रमुख डॉ. आनंद सोळंके, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख तथा या प्रशिक्षणाचे आयोजक डॉ. विक्रम कड, प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. पंडित खर्डे व डॉ. बाबासाहेब भिटे उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. गोरंटीवार आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की अलीकडच्या काळात बेकरी पदार्थांना मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठात होणाऱ्या बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान प्रशिक्षणामुळे बेकरी व्यवसायाला चालणा मिळणार असून यामुळे गावपातळीवर आर्थिक सुबत्ता येण्यास मदत होणार आहे. बचत गटाशी संबंधीत महिला तसेच ग्रामीण भागातील तरुणांनी या बेकरी व्यवसाय प्रशिक्षणाचा लाभ घेवून स्वतःचा उद्योग उभारल्यास विद्यापीठासाठी भुषणावह ठरेल. यावेळी डॉ. रणपिसे मार्गदर्शन करतांना म्हणाले की भरडधान्यामधील महत्वाचे पीक असणाऱ्या नागलीच्या बिस्कीटांना पौष्टिक गुणधर्मामुळे मोठी मागणी आहे. लहान मुले तसेच महिलांसाठी नाचणीसत्व त्यातील पोषणमुल्यामुळे महत्वाचे आहे. याचा फायदा या प्रशिक्षणामध्ये सहभागी महिलांनी स्वतःचा उद्योग उभारण्यासाठी करुन घ्यावा जेणेकरुन या व्यवसायामुळे त्यांना आर्थिक दृष्टीने स्वावलंबी होता येईल. डॉ. पवार आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की शेतकरी युवकांनी त्यांच्या शेतीला प्रक्रिया उद्योगाची जोड दिल्यास त्यांचे उत्पन्न खऱ्या अर्थाने दुप्पट होण्यास मदत होईल. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. विक्रम कड आपल्या प्रास्ताविकात प्रशिक्षण कार्यक्रमाचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. राहुल घुगे यांनी तर आभार डॉ. बाबासाहेब भिटे यांनी मानले. या प्रशिक्षणासाठी विविध जिल्ह्यातून २१ महिला व ९ युवक अशा एकुण ३० प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदविला.

## पीक विविधकरणाच्या पथदर्शी प्रकल्पाचा एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**दि. १९ मार्च, २०२४.** भारतीय किसान मंत्रालय, भारतीय कृषि प्रणाली संस्था, मोदीपूरम व अखिल भारतीय समन्वित एकात्मिक शेती प्रकल्प, मफुकृवि, राहुरी यांचे संयुक्त विद्यमाने पीक विविधीकरण या पथदर्शी प्रकल्पाद्वारे अहमदनगर जिल्हयातील कृषि अधिकाऱ्यांसाठी एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा प्रकल्प राबविण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. सी.एस. पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीमंत रणपिसे व विभाग प्रमुख कृषिविद्या डॉ. आनंद सोळंके यांचे मार्गदर्शन लाभत आहे. हा पथदर्शीय पीक विविधीकरण प्रकल्प महात्मा फुले कृषि विद्यापिठाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या दहा जिल्ह्यांपैकी आठ जिल्हयात राबविला जात आहे. या एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार होते. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. श्रीमंत रणपिसे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. सी.एस.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :४, अंक क्रं. : ३९, मार्च, २०२४



पाटील, कृषिविद्या विभाग प्रमुख डॉ. आनंद सोळंके, कार्यक्रमाचे आयोजक तथा एकात्मिक शेती प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. उल्हास सुर्वे, श्रीरामपुरचे उपविभागीय कृषि अधिकारी श्री. अमोल काळे, तालुका कृषि अधिकारी श्री. अविनाश चंदन, राहुरीचे तालुका कृषि अधिकारी श्री. बापूसाहेब शिंदे, मृदशास्त्रज्ञ डॉ. आदिनाथ ताकटे व कृषिविद्यावेत्ता डॉ. नितीन उगले उपस्थित होते.

यावेळी डॉ गोरंटीवार आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की बदलत्या वातावरणात एकात्मिक शेती तसेच योग्य पीक पध्दतीचा अवलंब करणे ही काळाची गरज आहे. यावेळी डॉ. रणपिसे व डॉ. पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणा दरम्यान डॉ. अनिल दुरगुडे यांनी जमीन आरोग्य व्यवस्थापन, डॉ. तुळशीदास बास्टेवाड यांनी यांत्रिकीकरण काळाची गरज, डॉ. भरत पाटील यांनी उन्हाळी भाजीपाला पिके लागवड, डॉ. सचिन नलावडे यांनी ड्रोनचा फवारणीसाठी वापर, डॉ. सुभाष घोडके यांनी ऊस लागवड तंत्रज्ञान, श्री. सोमनाथ तोडमल यांनी नविन शेतकरी उत्पादक कंपनी स्थापना व डॉ. उल्हास सुर्वे यांनी एकात्मिक शेती, सेंद्रिय शेती व नैसर्गिक शेती याविषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. सुर्वे यांनी पीक विविधीकरणाच्या प्रकल्पाची पार्श्वभूमी सांगितली. यावेळी सर्व प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या प्रशिक्षणासाठी अहमदनगर जिल्ह्यातून ४५ कृषि सहाय्यक, पर्यवेक्षक व कृषि अधिकारी उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी श्री. बाळासाहेब जाधव, श्री. दिगंबर पाटील व सेद्रीय शेती प्रकल्पातील सर्व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात जागतीक महिला दिन उत्साहात साजरा




**दि. ८ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना संचालनालय, पदव्युत्तर कृषि महाविद्यालय व डॉ अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतीक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवांकुर गृपच्या संचालिका व स्त्रीरोगतज्ञ डॉ. गौरी प्रकाश पवार होत्या. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन योगगुरु डॉ. बापुसाहेब पाटील उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर कुलगुरूंचे विशेष कार्य अधिकारी तथा

वर्ष :४, अंक क्रं. : ३९, मार्च, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

आंतरविद्याशाखा जलसिंचन विभाग प्रमुख डॉ. महानंद माने, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चौहान, डॉ. संगीता भोईटे, डॉ. रीतु ठाकरे आणि क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी उपस्थित होते.

पुर्वीच्या काळात साथीचे रोग उद्‌भवायचे. पण आत्ताच्या युगामध्ये धकाधकीच्या जीवनशैलीमुळे मधुमेह, रक्तदाब, कर्करोग, हृदयविकाराचे रोग मोठ्या प्रमाणात उद्‌भवत आहे. मधुमेह व रक्तदाब असलेल्या रुग्णांच्या संख्येत जगामध्ये भारताचा दुसरा क्रमांक लागतो. या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे स्त्रिया आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. यामुळे स्त्रियांना कर्करोगासारख्या मोठ्या आजाराला सामोरे जावे लागते. आपल्या देशातील स्त्रियांमध्ये हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी आहे. स्त्रियांचे आरोग्य सुदृढ बनवायचे असेल तर सकस आहार, विहार सुधारणे व विचार शुध्द ठेवणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन शिवांकुर गृपच्या संचालिका, स्त्रिरोगतज्ञ व जनरल सर्जन डॉ. गौरी पवार यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजक डॉ. महावीरसिंग चौहान यांनी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचा संदेश उपस्थितांना दिला. संदेशामध्ये ते म्हणाले स्त्रियांनी निरोगी आयुष्य जगण्यासाठी हिमोग्लोबीन वाढविण्याची गरज आहे. यासाठी स्त्रियांनी चौरस आहाराचा अवलंब करावा. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शन करतांना डॉ. बापुसाहेब पाटील म्हणाले स्त्रियांनी आपले आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी आपल्या दिनचर्यमध्ये योगा, प्राणायाम आणि सकस आहाराचा अंतर्भाव करावा. यावेळी त्यांनी योगा, प्राणायाम, आहाराचे महत्व व वेळा, आहाराचा प्रकार यावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, स्वागत आणि अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. महावीरसिंग चौहान यांनी करुन दिली. या कार्यक्रमाला प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार विद्यार्थीनी कु. दिव्या साठे यांनी मानले.

## विद्यापीठ ग्रंथालयात इंग्रजी भाषेच्या प्रयोगशाळेचे उद्‌घाटन



**दि. ४ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे विद्यापीठाच्या ग्रंथालयात इंग्रजी भाषेविषयीच्या प्रयोगशाळेचे उद्‌घाटन करण्यात आले. याप्रसंगी संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार, अधिष्ठाता डॉ. श्रीमंत रणपिसे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. सी.एस. पाटील, आंतरविद्या शाखेच्या जलसिंचन विभाग प्रमुख तथा कुलगुरुंचे विशेष कार्याधीकारी डॉ. महानंद माने, विद्यापीठ ग्रंथपाल डॉ. एम.आर. पाटील व विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चौहान उपस्थित होते. यावेळी डॉ. सुनील गोरंटीवार आपल्या भाषणात म्हणाले की आपली मातृभाषा मराठी असल्यामुळे विद्यार्थ्यांबरोबरच प्राध्यापकांनाही इंग्रजीमध्ये संवाद साधतांना अडचणी येतात. या प्रयोगशाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेमधील व्याकरण, शब्दोच्चार, स्पेलिंगमधील चुका यांच्यामध्ये सुधारणा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. वनस्पतीरोगशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. संजय कोळसे या प्रयोगशाळेविषयी माहिती देतांना म्हणाले की या प्रयोगशाळेचे महत्व विद्यापीठाचे मानांकन सुधारण्यासाठी महत्वाचे आहे. ही प्रयोगशाळा सुरु करणे हा उपक्रम पदव्युत्तर महाविद्यालयाचा असून विद्यापीठ ग्रंथालयाच्या मदतीने तो राबविण्यात येत आहे. याप्रसंगी या इंग्रजी भाषेच्या प्रयोगशाळेला तांत्रिक सहकार्य देणाऱ्या कंपनीचे तांत्रिक सहाय्यक श्री. प्रशांत जाधव यांनी प्रयोगशाळेविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे आभार डॉ. सुनील भणगे यांनी मानले. या प्रयोगशाळेच्या उभारणीसाठी डॉ. संजय कोळसे, डॉ. एम.आर. पाटील, डॉ. सुनील फुलसावंगे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी झालेल्या कार्यक्रमासाठी विभाग प्रमुख डॉ. अण्णासाहेब नवले, डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. अनिल काळे, डॉ. विलास वाणी, डॉ. विजू अमोलिक, प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. पंडित खर्डे तसेच विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

मफुकृवि ई वार्ता
मार्च २०२४



## वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन, पुणे यांचेकडून पाडेगाव ऊस संशोधन केंद्रास कुबोटा ट्रॅक्टर भेट






**दि. २९ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांतकुमार पाटील यांच्या आवाहनास प्रतिसाद देऊन पुणे येथील वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन यांचेकडून पाडेगाव येथील मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्रास २१ एच.पी. कुबोटा ट्रॅक्टर आणि रोटावेटर, पेरणी यंत्र, सारायंत्र, नांगर व रिजर अशी पाच अवजारे भेट देण्यात आली. सटाणा जि. नाशिक येथील द्वारकाधीश साखर कारखान्याच्या वतीने शेतकरी मेळाव्याचे आयोजन पिंपळनेर, ता. साक्री, जि. धुळे येथे करण्यात आले होते. यावेळी झालेल्या कार्यक्रमात महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. सी. एस. पाटील व पाडेगाव मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्राचे ऊस विशेषज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे यांच्याकडे वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. ठोंबरे यांनी ट्रॅक्टरच्या चाव्या सुपूर्द केल्या. यावेळी झालेल्या कार्यक्रमात डॉ. सी. एस. पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाने प्रसारित केलेल्या उसाच्या विविध वाहनांची तसेच ऊस लागवड तंत्रज्ञान शिफारशीमुळे राज्यातील ऊस उत्पादनामध्ये क्रांती व साखर उद्योगाची भरभराट झाल्याचे नमूद केले. यावेळी त्यांनी पाडेगाव ऊस संशोधन केंद्रास कुबोटा ट्रॅक्टर अवजारासह भेट दिल्याबद्दल असोसिएशनप्रती आभार व्यक्त केले. यावेळी झालेल्या तांत्रिक चर्चासत्रामध्ये डॉ. राजेंद्र भिलारे, डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके, डॉ. थोरवे या शास्त्रज्ञांनी उपस्थित असलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस पिकाच्या सुधारित लागवड तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी द्वारकाधीश साखर कारखान्याचे अध्यक्ष श्री शंकरराव सावंत कार्यकारी संचालक श्री. अजित चौगुले, लोकमंगल समूहाचे चेअरमन श्री. महेश देशमुख, नाथ म्हस्कोबा साखर कारखाना, धाराशिवचे चेअरमन श्री. राऊत उपस्थित होते.

## हिमोग्लोबीन तपासणी शिबिराचे आयोजन






**दि. १४ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठात जागतीक महिला दिनाच्या निमित्ताने विद्यापीठ दवाखान्यात विद्यार्थीनींसाठी हिमोग्लोबीन तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. श्रीमंत रणपिसे होते. याप्रसंगी कुलगुरु यांचे विशेष कार्य अधिकारी तथा आंतरविद्याशाखा जलव्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ.

महानंद माने, वैद्यकीय अधिकारी डॉ. वैशाली हिले, सहाय्यक प्राध्यापक डॉ. सचिन सदाफळ उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. श्रीमंत रणपिसे आपल्या भाषणात म्हणाले की पाश्चात संस्कृतीमुळे तरुण वर्ग फास्ट फुडकडे आकर्षित होत आहे. फास्ट फुडमुळे आरोग्याची हानी होती. आपल्या हिंदु संस्कृतीमध्ये आहाराला अनन्यसाधारण महत्व दिलेले आहे. प्रत्येक सणाला वेगवेगळ्या सकस आहाराची जोड दिलेली आहे. विद्यार्थीनींनी आहारामध्ये फळे, भाजीपाला, पौष्टिक तृणधान्ये, कॅलशिअम आणि लोहयुक्त पदार्थांना प्राधान्य द्यावे. आहाराबारोबर योगाही तेवढाच गरजेचा आहे. निरोगी जीवनासाठी योगा आणि सकस आहार महत्वाचा आहे. यावेळी डॉ. महानंद माने मार्गदर्शन करतांना म्हणाले की आत्ताच्या तरुण पिढीमध्ये हिमोग्लोबीनची कमतरता जाणवते ज्यामुळे विविध आजारांना सामोरे जावे लागते. त्यासाठी योग्य आहार, नियमीत रक्त तपासणी व वैद्यकीय सल्ला घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. डॉ. वैशाली हिले मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की ऋतुनुसार आहार व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. यावेळी पदव्युत्तर महाविद्यालय व कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थीनींची मोफत हिमोग्लोबीन तपासणी करण्यात येवून त्यांना वैद्यकीय सल्ला देण्यात आला. या हिमोग्लोबीन तपासणी शिबिराच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार कु. प्रतिक्षा शिरसाठ हिने मानले. या हिमोग्लोबीन तपासणी शिबिराला विद्यार्थीनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन प्रतिसाद दिला.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठातील भाकृअप–नवी दिल्लीच्या शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत अभ्यास दौरा संपन्न





**दि. ६ मार्च २०२४.** शेतकऱ्यांनी शेतामध्ये सेंद्रिय खतांचे प्रमाण वाढवून शेतीचा सेंद्रिय कर्ब वाढविणे आवश्यक आहे. जमिनीचा जितका सेंद्रिय कर्ब जास्त तितकी जमिनीची उत्पादकता जास्त असे प्रतिपादन मृदा शास्त्रज्ञ डॉ. अनिल दुरगुडे यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील व संचालक, विस्तार शिक्षण डॉ. सी. एस. पाटील यांचे मार्गदर्शनाखाली महात्मा फुले कृषि विद्यापीठातील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचा शेतकरी प्रथम प्रकल्पात सहभागी शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा बोरबन ता. संगमनेर, सावित्रीबाई शेळी शेतकरी उत्पादक कंपनी, सिन्नर व गावरान कोंबड्यांचा कुक्कुटपालन प्रकल्प, तळेगाव येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे, मृदा शास्त्रज्ञ डॉ.अनिल दुरगुडे, प्रकल्पाचे सहसमन्वयक डॉ. सचिन सदाफळ, श्री विजय शेडगे, श्री किरण मगर व श्री राहुल कोऱ्हाळे उपस्थित होते.

या अभ्यास दौऱ्यामध्ये तळेगाव येथील सौ. अनिता मुकुंद शिंदे त्यांच्या शेवग्याची शेती व गावरान कुक्कुटपालन प्रकल्पास भेट दिली. त्यांनी कशाप्रकारे कमी खर्चात गावरान कुकुटपालन व्यवसाय करावा व कमी पाण्यातील फायदेशीर शेती याविषयी माहिती दिली. बोरबन, ता. संगमनेर येथील कृषिभूषण आनंदा गाडेकर यांच्या केळी, द्राक्ष व डाळिंबाच्या सेंद्रिय शेतीस तसेच गांडूळ खत प्रकल्प व वर्मी वॉश प्रकल्पास भेट दिली. श्री. गाडेकर यांनी आपल्या मार्गदर्शनात सेंद्रिय खतांचा वापर करून जमिनीची प्रत व उत्पादकता वाढविता येते तसेच विषमुक्त शेतीचे महत्व समजावून सांगितले. सिन्नर येथील सावित्रीबाई शेळी शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये श्रीमती सुवर्णा काळे यांनी कंपनीच्या स्थापना पासून आजपर्यंतच्या वाटचालीविषयी माहिती दिली. महिलांनी कशा प्रकारे शेळीपालनातून प्रगती साधावी याविषयी मार्गदर्शन केले. शेळीच्या दुधापासून बनवण्यात येणाऱ्या विविध पदार्थांची माहिती दिली. शेळीच्या लेंडीपासून बनणाऱ्या गांडूळ खत प्रकल्पास शेतकऱ्यांनी भेट दिली. या अभ्यास दौऱ्यामध्ये चिंचविहिरे, कनगर, तांभेरे व कानडगाव येथील ३८ पुरूष व महिला शेतकरी सहभागी झाले होते.

वर्ष :४, अंक क्रं. : ३९, मार्च, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान प्रशिक्षण संपन्न






**दि. २२ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागाच्या वतीने दि. १८ ते २२ मार्च, २०२४ या कालावधीत बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि यंत्रे व शक्ती विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे होते. यावेळी अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख तथा या प्रशिक्षणाचे आयोजक डॉ. विक्रम कड, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयातील गणित विभागाचे प्रमुख डॉ. विक्रम पाटील, विद्यापीठ ग्रंथपाल डॉ. एम.आर. पाटील व डॉ. बाबासाहेब भिटे उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. नलावडे आपल्या भाषणात म्हणाले की भारत शेतीप्रधान देश आहे. येथील लोकसंख्येचा विचार करता अन्नाशी संबंधीत कोणताही व्यवसाय स्वतःवर ठाम विश्वास ठेवून जिद्दीने तसेच प्रामाणिकपणे केल्यास तुम्ही नक्कीच उद्योजक म्हणुन जीवनात यशस्वी व्हाल. यावेळी डॉ. कड आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की तुम्ही जोपर्यंत स्वतः एखादा पदार्थ बनवत नाही तोपर्यंत तुम्हाला तो पदार्थ बनविण्याचा आत्मविश्वास येणार नाही. त्यामुळे या प्रशिक्षणामध्ये प्रात्यक्षिकांवर जास्त भर देण्यात आला जेणेकरुन तुम्हाला स्वतःचा उद्योग सुरु करण्याचा आत्मविश्वास येईल. भविष्यात तुम्ही सुरु केलेल्या उद्योगाविषयी कोणतीही अडचण आल्यास राहुरी येथील अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागातील अधिकारी तसेच कर्मचारी मदतीसाठी सदैव तत्पर असतील अशी ग्वाही त्यांनी यावेळी सर्व प्रशिक्षणार्थींना दिली. यावेळी डॉ. विक्रम पाटील, डॉ. एम.आर. पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी विकास ठुबे, सोनाली शेटे, प्रशांत मोरे, सम्राट लांडगे व दिपीका काळे या प्रशिक्षणार्थींनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल घुगे यांनी तर आभार डॉ. बाबासाहेब भिटे यांनी मानले. या प्रशिक्षणासाठी विविध जिल्ह्यातून २१ महिला व ९ युवक अशा एकुण ३० प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदविला. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागातील श्रीमती सवीता धनवटे, पोपट खर्से, गोरक्षनाथ चौधरी, सुभाष माने यांनी परिश्रम घेतले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात माती व पाणी परिक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन संपन्न







**दि. ११ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील मृद विज्ञान विभागामार्फत माती व पाणी परीक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणाच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विस्तार शिक्षण संचालक डॉ. सी.एस. पाटील होते.

याप्रसंगी मृद विज्ञान विभाग प्रमुख तथा प्रशिक्षणाचे आयोजक डॉ. बी.एम. कांबळे, समन्वयक डॉ. रितू ठाकरे व डॉ. गणेश शेळके उपस्थित होते. या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील मृदा सर्वेक्षण व मृदा चाचणी अधिकारी, कृषि महाविद्यालय, खाजगी माती परीक्षण प्रयोगशाळेचे कर्मचारी सहभागी झाले आहेत. यावेळी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करतांना डॉ. सी.एस. पाटील म्हणाले की या प्रशिक्षणाचा लाभ प्रशिक्षणार्थींनी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवून मातीचे आरोग्य जपून शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत. डॉ. बी.एम. कांबळे, डॉ. रितू ठाकरे व डॉ. गणेश शेळके यांनी हे प्रशिक्षण आयोजीत करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. या प्रशिक्षणाला एकुण २३ प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदवला.

## औषधी व सुगंधी वनस्पती लागवड तंत्रज्ञान या विषयावरील एक दिवसीय शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न





**दि. १९ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत अखिल भारतीय समन्वित औषधी, सुंगधी वनस्पती व पानवेल संशोधन प्रकल्प, वनस्पती रोगशास्त्र व कृषि अणुजीवशास्त्र विभाग व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसुचित जाती उपयोजेनेअंतर्गत अनुसुचित जाती प्रवर्गासाठी एक दिवसीय शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम भोकर, ता. श्रीरामपूर येथे संपन्न झाला. या शेतकरी प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन वनस्पती रोगशास्त्र व कृषि अणुजीवशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. आण्णासाहेब नवले यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी डॉ. नवले यांनी औषधी व सुगंधी वनस्पतींचे महत्व व सेंद्रिय शेतीसाठी जैविक खतांचा वापर याबाबत मार्गदर्शन केले तसेच औषधी व सुगंधी वनस्पती लागवड तंत्रज्ञान शेतकऱ्यांसाठी दिशादर्शक ठरेल असे प्रतिपादन आपल्या अध्यक्षीय भाषणात केले. यावेळी पानवेल संशोधन प्रकल्पाचे प्रभारी अधिकारी डॉ. संजय गावडे यांनी विविध औषधी वनस्पतींचे लागवड तंत्रज्ञान व त्यांचे औषधी गुणधर्म याबाबत मार्गदर्शन केले. या प्रकल्पाचे किटकशास्त्रज्ञ प्रा. भारत पवार यांनी औषधी वनस्पतींवर येणारे विविध किटक व त्यांचे व्यवस्थापन कसे करावे याबाबत शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. प्रा. धनश्री पाटील यांनी सुगंधी पिके लागवड तंत्रज्ञान व त्यांचे औषधी गुणधर्म याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित प्रशिक्षणार्थींना ट्रेनिंग किट व औषधी वनस्पतींची रोपे वाटप करण्यात आले. प्रा. धनश्री पाटील यांनी आभार मानले. या कार्यक्रमात १५० पेक्षा जास्त महिला शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला. आशांकुर केंद्राच्या संचालिका प्रिस्का मॅडम व त्यांचे सर्व सहकारी यांचे या कार्यक्रमास मोलाचे सहकार्य लाभले.

## औषधी व सुगंधी वनस्पती या विषयावरील एक दिवसीय प्रशिक्षण संपन्न

**दि. २० मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत अखिल भारतीय समन्वित औषधी सुगंधी वनस्पती व पानवेल संशोधन प्रकल्प, वनस्पती रोगशास्त्र व कृषि अणुजीवशास्त्र विभाग व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी उपयोजना (टीएसपी) अंतर्गत एक दिवसीय प्रशिक्षण वर्ग मु.पो. रावलापाणी, ता.तळोदा, जि. नंदुरबार येथे संपन्न झाले. या प्रशिक्षण वर्गामध्ये प्रकल्पाचे प्रभारी अधिकारी डॉ.संजय गावडे यांनी औषधी व सुगंधी वनस्पतीचे महत्व व लागवड तंत्रज्ञान या विषयी सखोल मार्गदर्शन केले व औषधी व सुगंधी वनस्पतींची लागवड ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी आपल्या मार्गदर्शनात केले. यावेळी औषधी सुगंधी वनस्पतींची उपलब्ध बाजारपेठ, प्रक्रिया उद्योग, देशांतर्गत व परदेशातील मागणी व उत्पादन याबाबत माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. या एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमास विशेष उपस्थितांमध्ये नंदुरबार कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. राजेंद्र दहातोंडे, डॉ.

वर्ष :४, अंक क्रं. : ३९, मार्च, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी





भावसार व प्रकल्पाचे श्री. ऋषिकेश बरे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या शेवटी या प्रकल्पाचे प्रा. भारत पवार यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी नंदुरबार जिल्ह्यातील मु.पो. रावलापाणी, ता.तळोदा या गावातील आदिवासी वर्गातील शेतकरी बांधव उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात बांबु तोडणी प्रशिक्षण संपन्न





**दि. २१ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे रोष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प, अवर्षण प्रवण उपकेंद्र (वनशेती) यांच्या प्रक्षेत्रावर मुंबई येथील महाराष्ट्र बांबु प्रवर्तन प्रतिष्ठान यांच्या सहकार्याने तीन दिवसीय बांबु तोडणी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्‍घाटन कृषिविद्या विभाग प्रमुख डॉ. आनंद सोळंके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प, अवर्षण प्रवण उपकेंद्र (वनशेती)चे प्रभारी अधिकारी डॉ. बी.टी. सिनारे, डॉ. एस.एस. दिघे व प्रा. व्ही.एस. भारमल उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमात मुंबई येथील महाराष्ट्र बांबु प्रवर्तन प्रतिष्ठानचे श्री. दिनेश साळुंके यांनी बांबु तोडणी, बांबु साळणी, काठ्या तयार करणे व बांबुचे गठ्ठे बांधणे याबाबत कामगारांना सविस्तर प्रशिक्षण दिले.

## विद्यापीठ शेतकऱ्यांच्या दारी या उपक्रमांतर्गत वाशेरे येथे शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**दि. १८ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ शेतकऱ्यांच्या दारी या उपक्रमांतर्गत वाशेरे (ता. अकोले) येथे प्रगतिशील शेतकरी श्री. संपत वाकचौरे यांच्या शेतावर शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. संपत वाकचौरे होते. यावेळी वनस्पतिशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विजू अमोलिक, श्री. चंद्रकांत भारमल, औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्पाचे प्रमुख डॉ. विक्रम जांभळे, पोलिस पाटील श्री. सतीश वाकचौरे, सरपंच श्री. किरण गजे, साहित्यिक श्री. शांताराम गजे उपस्थित होते. यावेळी डॉ. अमोलिक आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की शेतकऱ्यांनी आपल्याकडिल विविध गावरान व पारंपरिक बियाणे जतन करून बीजोत्पादन करण्यासाठी ती महात्मा फुले कृषि विद्यापीठात जमा करावीत. त्यापासून

शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळेल. सकस, सात्त्विक, शुद्ध व पौष्टिक अन्नधान्याअभावी आजारांचे प्रमाण वाढते आहे. त्यासाठी वेळीच गावरान पारंपरिक बियाण्यांची उत्पादकता वाढवून, पौष्टिक व शुद्ध सात्त्विक अन्नधान्यातून आरोग्य चांगले ठेवण्याची आवश्यकता आहे. तेव्हा शेतकऱ्यांनी गावरान बियाणे विद्यापीठात स्टोअर करण्यासाठी जमा करावे. या कार्यक्रमासाठी श्री. रमाकांत डेरे, औषधी वनस्पती अभ्यासक श्री. रामलाल हासे, जादुगार श्री. पी.बी. हांडे, पत्रकार श्री. भाऊसाहेब मंडलिक, श्री. भरत बंगाळ, मधमाशीपालक श्री. राजू कानवडे, श्री. तुकाराम धुमाळ, श्री. बाळासाहेब देशमुख, श्री. बादशहा नवले, श्री. राजराम लांडे, श्री. धोडींराम वाकचौरे व श्री. तुकाराम कोटकर उपस्थित होते.

## राजर्षि छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयात जागतिक जल दिन उत्साहात साजरा



**दि. २२ मार्च, २०२४.** इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअर्स इंडिया, कोल्हापूर लोकल सेंटर आणि भारतीय जल संस्कृती मंडळ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापूरच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयात जागतिक जल दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन आयईआय समितीचे सदस्य इंजी. बलराम महाजन व डॉ. अनिलराज जगदाळे उपस्थित होते. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजर्षि छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शिवाजीराव पाचपुते होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाच्या विद्यार्थी– विद्यार्थिनींनी जलदिंडीचे आयोजन केले होते. प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते या जलदिंडीचे स्वागत आणि जलपूजन करण्यात आले. महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी इंजी. अजय देशपांडे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. विद्यार्थिनी सानिका नलावडे हिने माहितीपर भाषण केले. प्रा. मुकुंद गुंड, तांत्रिक अधिकारी यांनी उत्सवाच्या वॉटर फॉर पीस या थीमबद्दल माहिती दिली. डॉ. भारत कोलगणे, डॉ. ज्ञानेश्वर पतंगे, डॉ. मोहन जाधव, डॉ. मनीषा मोटे, डॉ. हृषीकेश सोनवणे, श्रीमती. सीमा सरवदे, क्रीडा अधिकारी श्री. रामचंद्र बोरसे, सहाय्यक कुलसचिव श्री. उत्तम गाताडे, सहाय्यक नियंत्रक श्री. नागेश यलगुलवार यांच्यासह महाविद्यालयाचे कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## कृषि महाविद्यालय, पुणे येथे विद्यार्थ्यांनी फुलवली स्ट्रॉबेरीची शेती

**दि. ४ मार्च २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या प्रेरणेतून सातत्याने नवनवीन प्रयोग सुरू असतात. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, पुणे येथील कृषि पदवीधरांमध्ये व्यावसायिक दृष्टिकोनाचा अवलंब करण्यासाठी कृषि आधारित अनुभवातून शिक्षण प्रणाली राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून कृषि पदवी आणि उद्यानविद्या पदवी विद्यार्थ्यांनी कृषि महाविद्यालयाच्या प्रक्षेत्रावर स्ट्रॉबेरी पिकांची यशस्वी लागवड करून चांगले उत्पादन काढले आहे. स्ट्रॉबेरी पीक म्हटलं की त्याची लागवड फक्त महाबळेश्वर परिसरात होते असा समज आहे, परंतु पुण्याच्या वातावरणात सुद्धा स्ट्रॉबेरी पिकाची लागवड शक्य आहे हे कृषि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सिद्ध करून दाखवले आहे. स्ट्रॉबेरी हे पीक संवेदनशील असून योग्य व्यवस्थापन आणि काळजी घेतली तर निश्चितच उत्पादन शक्य आहे. फक्त त्यासाठी लागवडीचा योग्य कालावधी महत्त्वाचा आहे असे निदर्शनास आले आहे.

अनुभवावर आधारित शिक्षणाचा भाग म्हणून कृषि महाविद्यालयाच्या प्रक्षेत्रावर २० गुंठे क्षेत्रावर स्ट्रॉबेरीच्या स्वीट सेन्सेशन, ब्रिलीयंन्स, एलिना, विंटर डॉन आणि ब्युटी अशा पाच जातींची लागवड करण्यात आली होती. लागवडीपासून ते काढणी आणि विक्री



व्यवस्थापनापर्यंतची सर्व कामे विद्यार्थ्यांनी केली आहेत. सर्वसाधारणपणे ७५ ते ८० दिवसांनी स्ट्रॉबेरीची काढणी सुरू होते आणि दीड ते दोन महिन्यापर्यंत काढणी सुरू राहते.जानेवारी महिन्यापासून या स्ट्रॉबेरीची काढणी सुरु झाली असून प्रति झाड सरासरी ३५० ते ४५० ग्रॅम एवढे उत्पन्न मिळत आहे. प्रत्येक झाडाला जवळपास ११ ते १७ फळे लागली आहेत. फळांचे सरासरी वजन २५ ते ३० ग्रॅम इतके आहे. एका फळाचे ८१ ग्रॅम इतके सर्वात जास्त वजन स्वीट सेन्सेशन या जातीचे दिसून आले आहे. दररोज जवळपास ४० ते ५० किलो स्ट्रॉबेरीची काढणी केली जाते, त्यातून महाविद्यालयास बारा ते पंधरा हजार रुपये दररोज मिळतात. कृषि महाविद्यालय, पुणे येथे घेण्यात आलेला हा पहिलाच प्रयोग असून कृषि महाविद्यालय, पुणेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासळकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उद्यानविद्या विभागातील प्राध्यापक डॉ. सुभाष भालेकर यांचे देखरेखीखाली स्ट्रॉबेरीची यशस्वी लागवड आणि उत्पादन घेणे शक्य झाले आहे. फळाची गुणवत्ता आणि गोडी या दृष्टिकोनातून स्वीट सेन्सेशन या जातीच्या स्ट्रॉबेरीची मागणी जास्त वाढत आहे.

## शेंडा पार्क वाचविण्यासाठी कृषि महाविद्यालयाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचा पुढाकार





**दि. ७ मार्च, २०२४.** गेल्या तीन वर्षात दहावेळा आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेल्या शेंडा पार्क येथील ऑक्सिजन पार्क मधील लागवड केलेल्या दुर्मिळ वृक्षसंपदेच्या संवर्धनासाठी आता राजर्षि छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयाच्या तृतीय वर्षाच्या सहाव्या सत्रातील विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला आहे. जुलै २०१८ मध्ये याच महाविद्यालयाच्या वरिष्ठ विद्यार्थ्यांनी इथल्या वृक्षलागवड मोहिमेत पुढाकार घेत एक आठवडा श्रमदान करीत वृक्ष लागवडीसाठी योगदान दिले होते. ही झाडे चांगली जगली वाढलीही होती, पण गेल्या तीन वर्षात वारंवार लागलेल्या आगीने ही वृक्षसंपदा अडचणीत सापडली आहे. अशावेळी आपल्या पूर्वसूरींच्या पावलावर पाऊल टाकत अडचणीत सापडलेल्या या झाडांच्या जोपासनेसाठी महाविद्यालयाच्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत एकूण ३५ हेक्टर क्षेत्रापैकी १० हेक्टर क्षेत्रावरील आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेल्या वृक्षांची मोजदाद केली, जी झाडे जगतील अशी आशा आहे त्या झाडांच्या सभोवताली आळी करत खते व पाणी यांचा पुरवठा केला. आवश्यक त्या ठिकाणी झाडांना आधार देत ती पुन्हा उभा करण्याचा प्रयत्न केला असून कृषि महाविद्यालयाचे सहयोगी

वर्ष :४, अंक क्रं. : ३९, मार्च, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

अधिष्ठाता डॉ. सातापा खरबडे यांच्या प्रेरणेने महाविद्यालयाच्या सुमारे दोनशे विद्यार्थ्यांनी शेंडापार्कची वनराई राखण्याकरिता श्रमदान केले. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेनेही या झाडांना पाणी देण्याकरिता टँकर पुरवत आपला वाटा उचलला. शहराच्या मध्यवस्तीत ऑक्सिजन पार्क उभा करण्याच्या संकल्पनेने वृक्षलागवड झालेल्या या ठिकाणी झाडांचा पाणीपुरवठा हा यक्षप्रश्न होता. तो सोडवण्यासाठी शेंडा पार्क येथील राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्पातील पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाने मोठ्या प्रयत्नाने विभागातील बोअरवेल मार्फत पाणी वृक्षलागवडीकडे नेले असून त्याचा येथील वनराई राखण्याकरिता निश्चितच उपयोग होईल. याकरिता विभागाचे पशुधन पर्यवेक्षक श्री. संजय कांबळे यांनी परिश्रम घेतले. येथील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी शेंडा पार्क येथे पाझर तलाव उभारण्याच्या दृष्टीने महाविद्यालयाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली. या श्रमदान मोहिमेत सहयोगी अधिष्ठाता डॉ.सातापा खरबडे, विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. शैलेंद्र कांबळे, उद्यानविद्या विभागप्रमुख डॉ. संग्राम धुमाळ, प्लेसमेंट सेल चे कार्यवाह डॉ. ज्ञानेश्वर पतंगे, कृषि वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. मुरलीधर कांबळे, सहाय्यक प्राध्यापक डॉ. उदयकुमार शिंदे यांनी स्वतः सहभाग घेत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. परिसरातील स्थानिकांनीही स्वयंस्फूर्तीने या मोहिमेत सहभाग नोंदविला.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे कृषि रंग २०२४ उत्साहात







**दि. ६ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर यांचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रम कृषि रंग २०२४ उत्साहात पार पडला. सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. अविनाश कोळगे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. गणेश देशमुख, शारीरिक शिक्षण निर्देशक डॉ. रियाज शेख त्याचबरोबर डॉ. बाळासाहेब रोमाडे, डॉ. रमेश चौधरी, श्री. रंगनाथ बागुल आणि श्री. नामदेव धुर्वे उपस्थित होते. यावेळी डॉ. संदीप पाटील यांनी विविध स्पर्धेतील पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांचे कौतुक करीत विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले व भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात शैक्षणिक, क्रीडा, राष्ट्रीय सेवा योजना व इतर सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेणाऱ्या व यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी स्नेहा वैद्य हिला यंदाच्या उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्काराने गौरविण्यात आले. पारितोषिक वितरण समारंभ झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या मधील वेगवेगळ्या गुणांचे नृत्य, गायन नाट्य स्वरूपात प्रदर्शित प्रदर्शन केले. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. रियाज शेख यांनी तर अहवाल वाचन विद्यार्थी परिषद सभापती कुमारी स्नेहा वैद्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथमेश कांबळे, नेहा पावरा, सिद्धांत पानगव्हाणे व अश्विनी पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रज्वल पाटील व वैष्णवी केकाने यांनी केले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगरद्वारा बामनोद येथे विद्यार्थी-शेतकरी-शास्त्रज्ञ परिसंवाद संपन्न

**दि. १३ मार्च, २०२४.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर अंतर्गत ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रम २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांनी शेतकरी-शास्त्रज्ञ परिसंवाद बामनोद येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील होते. याप्रसंगी ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रमाचे डॉ. अविनाश कोळगे, डॉ गणेश देशमुख आणि ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रमाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सागर बंड, माजी सभापती श्री. नरेंद्र कोल्हे व प्रगतशील शेतकरी श्री. जावळे उपस्थित होते. यावेळी

डॉ





संदीप पाटील यांनी शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञान व त्याचा वापर याबद्दल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात डॉ. अविनाश कोळगे यांनी कापूस लागवड व त्याची पूर्वतयारी या विषयावर शेतकरी बांधवांना मार्गदर्शन केले. तसेच केळी लागवड व व्यवस्थापन या विषयावर डॉ. गणेश देशमुख यांनी मार्गदर्शन केले आणि जैविक कीड नियंत्रण या विषयावर डॉ. सागर बंड यांनी शेतकरी बंधूंना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रतीक सुतार यांनी केले व आभार प्रदर्शन नंदनी पवार यांनी केले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगरच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल संपन्न






**दि. ३१ मार्च, २०२४.** कृषि महाविद्यालय मुक्ताईनगरच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांची महाराष्ट्र दर्शन शैक्षणिक सहल दिनांक २६ मार्च २०२४ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात पार पडली. या शैक्षणिक सहलीमध्ये महाविद्यालयातील प्रथम वर्षाचे ७५ विद्यार्थी, प्रा. रंगनाथ बागुल, डॉ. तुषार भोसले आणि श्री. अशोक पाटील सहभागी झाले होते. या महाराष्ट्र दर्शन शैक्षणिक सहली दरम्यान विद्यार्थ्यांनी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, विभागीय नारळ संशोधन केंद्र, भाटे (रत्नागिरी), गहू गेरवा संशोधन केंद्र, महाबळेश्वर आणि महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील विविध ठिकाणी भेटी देऊन कृषि विषयक ज्ञान मिळविले. या शैक्षणिक सहलीच्या यशस्वी नियोजनासाठी महाविद्यालयातील डॉ. गणेश देशमुख, प्रा. रंगनाथ बागुल, डॉ. तुषार भोसले आणि श्री. अशोक पाटील यांनी परिश्रम घेतले.

## कृषि विज्ञान संकुल, काष्टी येथील विद्यार्थ्यांची दक्षिण भारतात शैक्षणिक सहलीचे आयोजन

**दि. १८ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत कृषि विज्ञान संकुल काष्टी, मालेगाव येथील कृषि महाविद्यालय व कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, काष्टी, मालेगाव मधील विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल दक्षिण भारतातील केरळ येथे १८ मार्च ते २४ मार्च २०२४ या दरम्यान आयोजित करण्यात आली होती. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षामध्ये अभ्यासक्रमाचा भाग म्हणून कृषि महाविद्यालय,







काष्टीमधील चौथ्या सत्रामधील ३९ विदयार्थी व कृषि व्यवसाय व्यस्थापन महाविद्यालय, काष्टी येथील सहाव्या सत्रातील ३१ विद्यार्थी व ६ प्राध्यापक हे केरळ येथे सात दिवसांच्या सहलीस सहभागी झाले होते. या शैक्षणिक सहलीमध्ये विषेशतः केरळमधील पहिल्या दिवशी मुन्नार येथील चहाचे मळे, रिपल चहा फॅक्टरी, औषधी व मसाले उद्यान, गुलाब उद्यान, वनस्पती उद्यान, चॉकलेट फॅक्टरी, मदुपेट्टी धरण येथे भेट देण्यात आली. दुसऱ्या दिवशी एम. एस. स्वामीनाथन भात संशोधन केंद्र, मोनकंपू येथे भेट देऊन विद्यार्थ्यांना भात संशोधनाची सविस्तर माहिती मिळाली. तिसऱ्या दिवशी ह्लेपे येथील समुद्रात हाऊस बोटचा आनंद घेऊन केंद्रीय कंद पीक संशोधन संस्था, थिरूआनंतपुरम येथे भेट दिली. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील आणि अधिष्ठाता डॉ. श्रीमंत रणपिसे यांच्या परवानगीने व डॉ. एस.पी. सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली या शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या शैक्षणिक सहलीचे यशस्वी आयोजनासाठी सहल प्रमुख डॉ. दिनेश बिरारी व त्यांचे सहकारी डॉ. सूरज गडाख, डॉ. नंदलाल देशमुख, डॉ. रितेश पाटील, डॉ. नेहा काळे व प्रा. अनिता लघुळकर यांचे सहकार्य लाभले.

## धुळे कृषि विज्ञान केंद्राची ३२ वी शास्त्रज्ञ सल्लागार समितीची बैठक उत्साहात संपन्न



**दि. ६ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या धुळे कृषि विज्ञान केंद्राची शास्त्रज्ञ सल्लागार समितीची बैठक कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व विस्तार शिक्षण संचालक डॉ. सी.एस. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली धुळे येथे संपन्न झाली. या बैठकीस अटारी, पुणेचे शास्त्रज्ञ डॉ. तुषार आठरे, धुळे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी.एम. इल्हे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. कुरबान तडवी, गहू पैदासकार डॉ. सुरेश दोडके, पशुसंवर्धन विभागाचे सहायक उपायुक्त डॉ. मिलिंद भंगे, कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, विभागीय कृषि संशोधन केंद्र, इगतपूरीचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. हेमंत पाटील, मत्स्य विभागाचे श्री. अविनाश गायकवाड, बाजरी पैदासकार डॉ. खुशल बऱ्हाटे, तेलबिया संशोधन केंद्र, जळगाव प्रमुख शास्त्रज्ञ व कापूस पैदासकार डॉ. दिपक दहाट, आत्मा प्रकल्प संचालक श्री. नवनाथ कोळपकर, सहाय्यक प्राध्यापक डॉ. भगवान देशमुख, कृषि विकास अधिकारी श्रीमती. कावेरी राजपूत, नाबार्डचे व्यवस्थापक श्री. अभिजीत रांजणकर व धुळे कृषि महाविद्यालयातील प्राध्यापक बैठकीस उपस्थित होते.

यावेळी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये डॉ. सी.एस. पाटील म्हणाले की सद्य परिस्थितीमध्ये जमिनीचा सेंद्रिय कर्ब अत्यंत खालवला असून त्यामुळे जमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. मधुमक्षिकापालनाने नैसर्गिकरित्या दुर्मिळ व वनस्पती प्रजातींचे संवर्धन होत आहे. मधुमक्षिका पिकांच्या परागीभवनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात त्यामुळे निश्चितच शेतकऱ्यांचे उत्पादन वाढण्यास मदत होणार आहे. शेतकरी बांधवांनी पर्यावरण पूरक जैविक कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादींचा वापर वाढवून रासायनिक कीटकनाशकांचे प्रमाण कमी करण्याचे आव्हान डॉ. पाटील यांनी याप्रसंगी केले. याप्रसंगी डॉ. बी.एम. इल्हे मार्गदर्शन करतांना म्हणाले की आधुनिक शेती युगामध्ये कमी श्रमात अधिक उत्पादन मिळविण्याकरिता शेतकरी बांधवांनी विद्यापीठाने विकसित केलेले वाण व विद्यापीठाने शिफारशीत केलेल्या तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. यावेळी डॉ. दिनेश नांद्रे यांनी कृषि विज्ञान केंद्राचा २०२३ चा वार्षिक प्रगती अहवाल सादरीकरणाच्या स्वरूपात सादर केला व २०२४ मध्ये राबविण्यात येणाऱ्या कामाच्या कृती आराखड्याची माहिती उपस्थितांना अवगत करून दिली. याप्रसंगी श्री अन्न नाचणी या घडीपत्रिकेचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. यावेळी वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकरी श्री. महेंद्र परदेशी यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. विषय तज्ञांनी अहवालाचे सादरीकरण केले. त्यानंतर महात्मा फुले कृषि विद्यापीठ कृषि पदवीधर आयडॉल श्री. जयेश पाटील, रा. पिंप्री, ता. जि. धुळे यांच्या पशु फार्मवर सर्व मान्यवरांनी भेट देऊन त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामाचे कौतुक केले. या बैठकीचे सूत्रसंचालन श्री. जगदीश काथेपुरी यांनी तर आभार श्रीमती अमृता राऊत यांनी केले. या बैठकीसाठी शेतकरी प्रतिनिधी श्री. हितेंद्र गिरासे, उपाध्यक्ष, शेतकरी शास्त्रज्ञ मंच, श्री. नरेंद्र पाटील, श्री.जयेश पाटील, श्री. महेंद्र परदेशी, श्री. विनोद पाटील, श्री. आबा मोरे, महिला प्रतिनिधी श्रीमती भारती माळी, श्रीमती रेणुका चव्हाण उपस्थित होते.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे किफायतशीर शेळीपालन या विषयावरील तीन दिवसीय प्रशिक्षण संपन्न



**दि. ५ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, धुळे व सेवा सहयोग संस्था, पुणे यांचे माध्यमातून महिलांसाठी तीन दिवसीय शेळीपालन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, उद्यानविद्यावेत्ता प्रा. श्रीधर देसले, कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ डॉ. महेश गणापुरे, श्री. जगदीश कथेपुरी, डॉ. धनराज चौधरी, पुणे येथील सेवा सहयोग संस्थेचे अधिकारी श्री. अनिल पाटील, श्री. पंकज राठोड उपस्थित होते. अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये डॉ.दिनेश नांद्रे यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेमधील शेळीपालनाचे महत्व अधोरेखित करत उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. तांत्रिक चर्चासत्रामध्ये डॉ. महेश गणापुरे, डॉ.धनराज चोधरी, श्री.रोहित कडू, प्रा.अमृता राऊत, श्री. भाऊसाहेब देसले यांचे मार्गदर्शन लाभले. या प्रशिक्षणाचे प्रास्ताविक डॉ.धनराज चोधरी यांनी केले. प्रास्तविकामध्ये त्यांनी प्रशिक्षणाचा उद्देश सांगत, कृषि बरोबर कृषि पूरक व्यवसायामध्ये पशुसवंर्धन करत असताना महिलांचे योगदान कसे महत्वाचे आहे हे अधोरेखित करत शेळीपालनाचे महत्व याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सदर महिला प्रशिक्षणाचा समारोप डॉ.राहुल देसले, प्राचार्य, घटक कृषि तंत्र, विद्यालय, धुळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आला. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी डॉ. देसले यांनी शेळी उत्पादनाचे सद्यस्थितीमधील महत्व या विषयावर मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. धनराज चौधरी यांनी केले. या प्रशिक्षणामध्ये ग्रामीण महिला पशुपालक यांनी सहभाग नोंदवला.

## धुळे कृषि विज्ञान केंद्रात कौशल्य विकास आधारित अन्न प्रक्रिया उद्योग या विषयावर प्रशिक्षण संपन्न




**दि. १९ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे आत्मा, कार्यालय, नंदुरबार यांच्या सहकार्याने तीन दिवसीय अन्न प्रक्रिया उद्योग या विषयावरील प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचे उदघाटन धुळे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी.एम. इल्हे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी घटक कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल देसले, प्रा.श्रीधर देसले, कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, श्री. जगदीश कथेपुरी, डॉ. धनराज चौधरी व सौ. प्राची काळे उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. इल्हे यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेमधील अन्न प्रक्रियेचे महत्व अधोरेखित करत उपस्थितांना मार्गदर्शन केले तसेच जास्तीत जास्त महिलांनी अशा प्रकारच्या प्रशिक्षणामध्ये सहभाग नोंदवत अन्न प्रक्रिया उद्योगातील शास्त्रीय बाबी तसेच विक्री विपनंनाचे कौशल्य समजून घेवून नियोजन करण्याचे आव्हान केले. प्रमुख मार्गदर्शनामध्ये डॉ. देसले यांनी अन्न प्रक्रियेतील मूल्यवर्धन व मूल्यसवंर्धन तसेच दुग्ध प्रक्रियेचे महत्व सांगत उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाचे प्रास्ताविकात डॉ. नांद्रे यांनी प्रशिक्षणाचा उद्देश तसेच कृषि बरोबर कृषि पूरक व्यवसायामध्ये अन्न प्रक्रिया उद्योगाचे महत्व व यामधील महिलांचे योगदान यावर मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाचे सूत्रसंचालन डॉ. धनराज चौधरी यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ. प्राची काळे व डॉ. पंकज पाटील यांनी मानले. चर्चासत्राच्या यशस्वितेसाठी श्री. रोहित कडू, श्री. स्वप्नील महाजन, श्री. बाळू वाघ, श्री. कुमार भोये, श्री. रमेश शिंदे, श्री. मधुसूदन अहिरे, श्री. कुणाल राजळे, श्री. जीवन राणे तसेच कृषि विभाग व आत्मा कार्यालय, नंदुरबार यांचे सहकार्य लाभले. सदर प्रशिक्षणामध्ये अदिवासी बहुल भागातील महिलांनी सहभाग नोंदवला.

## कृषि विज्ञान केंद्र, बोरगांव येथे समृध्द किसान मेळावा व ऊस पीक परिसंवाद संपन्न





**दि. १२ मार्च, २०२४.** कृषि विज्ञान केंद्र, बोरगांव, कृषि जागरण, नवी दिल्ली, महिंद्रा ट्रॅक्टर आणि धानुका कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने समृध्द किसान मेळावा घेण्यात आला. यानिमित्ताने ऊस पीक परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हयातील प्रगतशील

शेतकरी सन्मान सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पंचक्रोशीतील प्रगतशिल शेतकरी, अन्नप्रक्रिया उद्योजक, महिला उद्योजक, शेतकरी उत्पादक कंपनी यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. महेश बाबर यांनी उपस्थितांना कृषि विज्ञान केंद्राच्या उपक्रमांची माहिती दिली. या कार्यक्रमासाठी शेंद्रे येथील अजिंक्यतारा साखर कारखान्याचे चेअरमन श्री. यशवंत साळुंखे व संचालक श्री. मोहन साळुंखे हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. यावेळी प्रगतशील शेतकरी श्री. ऋषिकेश ढाणे यांनी कृषि मालावर प्रकिया करण्याबाबत मत व्यक्त केले. तांत्रिक मार्गदर्शनामध्ये पाडेगांव येथील मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्राचे ऊस रोगशास्त्रज्ञ डॉ. सुरज नलवडे यांनी ऊसाच्या नवीन जाती, लागवड व उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर मार्गदर्शन केले. बोरगाव कृषि विज्ञान केंद्राच्या विषय विशेषज्ञ डॉ. स्वाती गुर्वे यांनी ऊसातील किड व रोग व्यवस्थापन यावर उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. विषय विशेषज्ञ डॉ. कल्याण बाबर यांनी भरडधान्य प्रक्रिया उद्योग उभारणी व प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेचे महत्व विषद केले. यावेळी महिंद्रा ट्रॅक्टर्स, धानुका कंपनी यांच्या प्रतिनिधींनी सादरीकरण केले. याप्रसंगी विविध प्रक्रियायुक्त उत्पादनांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी कृषि भुषण पुरस्कारप्राप्त शेतकरी, प्रगतशिल शेतकरी, उद्योजक, महिला बचत गट, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे सदस्य, पंचकोशितील ग्रामपंचायत सरपंच व सदस्य, सोसायटी चेअरमन उपस्थित होते. मेळावा आयोजन करण्यामध्ये श्रीमती श्रुती जोशी, श्री. ऋषिकेश काळंगे, श्री. सतीश वायाळ आणि श्री. हर्षल साबळे मोलाचा वाटा होता. या कार्यक्रमासाठी कृषि विज्ञान केंद्र, बोरगांव येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव येथे नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत दोन दिवसीय प्रशिक्षण संपन्न





**दि. १३ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव आणि कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा, आत्मा, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत शास्त्रज्ञ निवड केलेल्या गटप्रमुख, कृषि अधिकारी आणि कर्मचारी यांचा दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम कृषि विज्ञान केंद्र बोरगाव येथे पार पडला. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सातारा येथील आत्माचे प्रकल्प संचालक श्री. विकास बंडगर, कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख तथा कार्यक्रम समन्वयक डॉ महेश बाबर, पिक संरक्षण शास्त्रज्ञ सूरज नलवडे, उद्यानविद्या विभागाचे विषय विशेषज्ञ प्रा. भूषण यादगीरवार उपस्थित होते. सदरचा प्रशिक्षण कार्यक्रम कोरेगाव तालुक्यातील विविध गावांमधील नैसर्गिक पद्धतीने शेती करणारे गटप्रमुख व त्या संबंधित कृषि अधिकारी व कर्मचारी यांच्याकरीता घेण्यात आला. यावेळी श्री. बंडगर यांनी प्रास्ताविक करताना डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनमध्ये राबविलेला जाणाऱ्या गोष्टींचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. यादगीरवार यांनी नैसर्गिक व सेंद्रिय शेती म्हणजे काय व सोबत शेतीमध्ये कीड व रोग संरक्षणासाठी आणि जिवाणूंची संख्या वाढविण्यासाठी मार्गदर्शन केले. ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथील सहायक प्राध्यापक डॉ. सूरज नलावडे यांनी जिवाणू खतांबद्दल माहिती दिली. हवामान बदल व पिकात होणारे नुकसान या विषयावर डॉ. मयूर सुतार यांनी माहिती दिली. डॉ. सागर सकटे यांनी अझोला उत्पादन तंत्रज्ञान व त्याचा उपयोग या विषयी सविस्तर माहिती दिली. दुसऱ्या दिवसाच्या सत्रामध्ये प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये कृषि विज्ञान केंद्राच्या केंद्राने उभारलेल्या निविष्ठा निर्मिती युनिटमध्ये डॉ. यादगीरवार यांनी शेतकऱ्यांना जीवामृत कशाप्रकारे बनवायचे तसेच जीवामृत करताना कोणकोणत्या बाबींचा वापर करायचा दशपर्णी अर्क बनवताना कोणत्या वनस्पतींचा वापर करायचा याविषयी प्रात्यक्षिकही

करून दाखवण्यात आले. सेंद्रिय शेती अभ्यासक श्री. घाडगे यांनी ब्रम्हास्त्र व अग्निअस्त्र तयार करण्याबाबत प्रात्यक्षिक करून दाखविले. शेतकरी उत्पादक कम्पनी निर्मितीविषयी श्री. अजिंक्य घाडगे यांनी माहिती दिली. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी आत्माचे तालुकास्तरीय अधिकारी, कृषि सहाय्यक आणि विविध गटातील गटप्रमुख, सचिव आणि खजिनदार उपस्थित होते.

## पिंपळगाव निपाणी येथे रब्बी पीक शिवार फेरी कार्यक्रम संपन्न





**दि. ५ मार्च, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या जिल्हा विस्तार केंद्र, कृषि संशोधन केंद्र, निफाड यांचे मार्फत निवड केलेल्या पिंपळगाव निपाणी, ता. निफाड, जि. नाशिक या गावात रब्बी–पीक शिवार फेरीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर शिवार फेरी कार्यक्रम कृषि संशोधन केंद्राचे प्रमुख गहू विशेषज्ञ डॉ. सुरेश दोडके आणि जिल्हा विस्तार केंद्राचे प्रमुख डॉ. योगेश पाटील यांचे प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाला. पिंपळगाव निपाणी या गावात एकूण १५ शेतकऱ्यांच्या शेतावर कृषि संशोधन केंद्र, निफाड येथून नव्याने प्रसारित झालेल्या दोन पाण्यात येणाऱ्या NIAW–४०२८ या गहू वाणाचे आद्यरेखा प्रात्यक्षिक घेण्यात आलेले आहेत त्या अनुषंगाने NIAW–४०२८ या गहू वाणाचे प्रात्यक्षिक घेतलेल्या शेतकऱ्यांच्या शेतावर शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या शिवार फेरी दरम्यान परिसरातील प्रगतीशील शेतकरी उपस्थित होते. दोन पाण्यात गव्हाचे अधिकतम उत्पन मिळालेल्या शेतकऱ्यांनी पुढील वर्षी जास्त प्रमाणात NIAW–४०२८ गहू लागवड करणार असल्याचे यावेळी सांगितले. तसेच फुले विक्रम या हरभरा पिकाच्या वाणाची लागवड परिसरातील बहुसंख्य शेतकऱ्यांनी केलेली आहे. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी डॉ. सुरेश दोडके यांचे मार्गदर्शन लाभले. प्रशिक्षण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. योगेश पाटील यांनी तर आभार श्री. ज्ञानेश्वर खाडे यांनी मानले. या रब्बी पीक शिवार फेरीच्या यशस्वीतेसाठी पिंपळगाव निपाणी गावाचे ग्रामपंचायत सदस्य, विविध कार्यकारी सोसायटीचे पदाधिकारी, नागरिक, शेतकरी आणि कृषि संशोधन केंद्र, निफाडचे अधिकारी, कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## एप्रिल महिन्यातील कामांचा तपशील

### ऊस

- सुरु ऊसासाठी रासायनिक खताचा तिसरा हप्ता हेक्टरी २५ किलो नत्र (५५किलो युरिया) (१.२२पोती) देऊन बाळबांधणी करावी.
- ऊस पिकास १० ते १२ दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे. शक्य असल्यास ऊसात पाचटाचे आच्छादन करावे. पाणी कमी असल्यास ऊसाला एक सरी आड पाणी द्यावे.
- सुरू ऊसासाठी एप्रिलच्या दुसऱ्या आठवडयात संजीवकांच्या तिसऱ्या फवारणीसाठी हेक्टरी ३५० लिटर पाणी लागेल. त्याकरिता जी.ए. ३ जिब्रेलिक ॲसीड (४० पीपीएम) १४ ग्रॅम, ६ बी.ए. : ६ बेन्झिल ॲडेनाईन (४० पीपीएम) १४ ग्रॅम, ३५०० ग्रॅम १९:१९:१९, ८७५ ग्रॅम चिलेटेड सुक्ष्म अन्नद्रव्य व १७५० ग्रॅम सिलिकॉन (सिलिसायलिक ॲसिड) एकत्रित करून उसाच्या पानावर फवारणी करावी.
- खोडकिड या किडीचा फार प्रादुर्भाव झाल्यास शेतात उगवण विरळ दिसते. अशा वेळी एकरी रोपांची संख्या योग्य प्रमाण राखण्यासाठी

वर्ष :४, अंक क्रं. : ३९, मार्च, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

लागणीबरोबर प्लॉस्टिकच्या पिशव्यांमध्ये अगर प्लास्टीक ट्रे मध्ये पुरेशी ऊसाची रोपे तयार करून योग्य वेळी नांग्या भरण्यासाठी (विरळ जागी) ही रोपे वापरावीत.

- पाचटाचे सरीमध्ये आच्छादन (मल्चिंग) आवश्यक करावे. त्यामुळे देखील खोडकिडीचा प्रादुर्भाव कमी होतो.
- ऊसाला एक ते दीड महिन्यानंतर बाळ बांधणी केल्यास खोडकिडीचे पतंग बाहेर पडल्याने तयार झालेली छिद्रे बंद होण्यास मदत होईल व पतंग बाहेर पडणार नाहीत.
- ऊस लागवडीनंतर ४० ते ५० दिवसांनी ५ फुले ट्रायकोकार्ड प्रति हेक्टर या प्रमाणात साधारणः १० ते १५ दिवसांच्या अंतराने लावावीत.
- खोड किडीच्या नियंत्रणासाठी ऊसाच्या शेतात ट्रायकोग्रामा चिलोनिस ५ ट्रायकोकार्ड १५ दिवसाच्या अंतराने प्रति हेक्टरी व ५ कामगंध सापळे (इ.एस.बी.ल्यूर) शेतात लावावे. आवश्यकता असल्यास क्लोरॅन्ट्रॅनिलीप्रोल ०.४% दाणेदार हे किटकनाशक १८.७५ किलो अथवा फिप्रोनिल ०.३% दाणेदार हे किटकनाशक २५ किलो प्रति हेक्टरी याप्रमाणात सरीमध्ये चळीतून द्यावे. सदरील किटकनाशक वापरतांना १ किलो औषधामध्ये ३ किलो बारीक माती चांगली मिसळावी व कुदळीने अर्धा फुट अंतरावर चळी घेवून माती आड करावे व हलके पाणी द्यावे. सर्व प्रकारच्या ऊस पोखरणाऱ्या किडींसाठी अशा प्रकारचे दाणेदार औषधांची उपाययोजना करावी. तरच आपल्याला चांगल्या प्रकारे परिणाम मिळतो.
- काणी व गवताळ वाढीची बेटे समूळ काढून नष्ट करावीत.
- ऊसासाठी ठिबक सिंचनाचा वापर करावा. ठिबक सिंचनाची सोय असल्यास ५ ते ९ आठवडयांपर्यंत ऊसाच्या वाढीच्या अवस्थेनुसार प्रति हेक्टरी ७० किलो नत्र, ३२ किलो स्फुरद व १४ किलो पालाश तर १० ते १२ आठवडयांपर्यंत प्रति हेक्टरी १०० किलो नत्र, ५१ किलो स्फुरद व ३२ किलो पालाश प्रति हेक्टरी सात दिवसांच्या अंतराने समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत.
- ऊस पिकासाठी जास्तीत जास्त क्षेत्रावर शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन पाणी व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब करावा.
- ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता कमी आहे अशा ठिकाणी यापुढे पाणी देताना एक आड सरीतुन पाणी द्यावे.
- पाण्याचा ताण पडत असल्यास उभ्या पिकातील खालची पक्व झालेली तसेच वाळलेली पाने काढून ती आच्छादन म्हणून सरीत पसरावी. जेणे करून पाण्याचे बाष्पीभवन कमी होवून जमिनीत ओलावा टिकवून राहण्यास मदत होईल.
- पिकास पाण्याचा ताण असल्यास लागणीनंतर ६०, १२० आणि १८० दिवसांनी २% म्युरेट ऑफ पोटॅश व २% युरीया यांचे मिश्रण करून पिकावर फवारणी करावी.
- पाण्याची कमतरता असल्यास बाष्पीभवन कमी करण्यासाठी ६ ते ८% केवोलीन या बाष्परोधकाची फवारणी करावी.
- ऊस पिक हे तण विरहीत ठेवावे. त्यामुळे उपलब्ध पाण्यासाठी होणारी स्पर्धा कमी होवून ऊस वाढीसाठी उपयुक्त ठरेल.
- लागवडीच्या ऊस पिकात तसेच खोडव्याच्या पिकास हेक्टरी ५ ते ६ टन पाचटाचे आच्छादन करून प्रती टन पाचटासाठी ८ किलो युरीया, १० किलो सुपर फास्फेट व १ किलो पाचट कुजविणाऱ्या जिवाणूंचा वापर करावा.

**भुईमूग (उन्हाळी)**

- भुईमूग पिकाच्या पानावरील टिक्का व तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास फ्ल्युबेनडॅमाईड ३.५% +हेक्झाकोनॅझोल ५% डब्ल्यु.जी.२५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे.

**बागायती कापूस**

- कापूस लागवडीसाठी मध्यम ते भारी, ९० सें. मी. पेक्षा जास्त खोली असणारी व चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. जमिनीचा सामू ६ ते ८.५ पर्यंत असावा. जमिनीची खोल नांगरट करून जमीन उन्हाळ्यात तापू द्यावी.

**गहू**

- धान्य कडक उन्हात वाळवून साठवणूक करावी. साठवणुकीच्या वेळी औषध वापरावे.

**खरीप नाचणी लागवड**

- शेतीची नांगरट करणे

वर्ष :४, अंक क्रं. : ३४, मार्च, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

- कुळवणी करणे.
- शेतातील धसकटे वेचणे.

### फळबाग व्यवस्थापन

- **डाळिंब –** पाणी व्यवस्थापनाकडे लक्ष द्यावे. फळ पोखरणाऱ्या अळीचे नियंत्रणासाठी ५% निंबोळी अर्काची फवारणी करावी.तेल्या रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी हंगामी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात.
- **सिताफळ –** बहार धरलेल्या झाडासाठी पाणी व्यवस्थापन करावे. पिठ्या ढेकूण या किडीचे सर्वेक्षण करुन किड व्यवस्थापन करावे.
- **बोर –** बहार ताणावर सोडावी.
- **कागदी लिंबू –** उन्हाळ्यात ८–१० दिवसाचे अंतराने पाणी द्यावे. रोगट, किडग्रस्त व वाळलेल्या फांद्याची छाटणी करावी. काळीमाशी : थायोमिथोक्झाम (२५ डब्लु. जी.) १ ते १.५ ग्रॅम / १० लि. पाण्यातून फवारावे. खवले कीड : क्विनॉलफॉस ३० मिली / १० लि. पाण्यातून फवारावे. शेंडेमरः कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम/ १० लि. पाण्यातून फवारावे. मोसंबी व लिंबू बागेमध्ये फांदीमर रोगाच्या नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून एप्रिल महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवडयात फवारणी करावी.
- **पेरू –** फळमाशीचे कोष नष्ट करण्यासाठी झाडाभोवती कुदळनी/नांगरणी करावी.
- **द्राक्ष –** खरड छाटणी करावी व वलांडे १% बोर्डो मिश्रणाने धूवून घ्यावे.
- **आंबा –** फळे अंड्याच्या आकाराची झाल्यावर फळ पिकांचा वापर करावा.

### भाजीपाला व्यवस्थापन

- रबी कांद्याचे पीक काढणी अवस्थेत असल्यास तीन आठवडे आधी पिकांचे पाणी तोडावे. त्याचप्रमाणे बुरशीनाशकाचा फवारा द्यावा.
- लसूण पीक काढणी अवस्थेत असल्यास तीन आठवडे आधी पाणी तोडावे व बुरशीनाशकाची फवारणी करावी.
- कांदा पिकाची काढणी करून कांदा ३ ते ५ दिवस शेतात सुकवावा.
- कांद्याची पात कापतेवेळी २.५ ते ३.० सेंमी. पात ठेवून कापावी.
- पात कापलेला कांदा १५ ते २० दिवस सावलीमध्ये सुकवावा व प्रतवारी करून मध्यम आकाराचा कांदा चाळीमध्ये साठवावा.
- लसूण पिकाची काढणी करून पातीसह गड्या बांधून हवेशीर जागेवर साठवण करावी.
- टोमॅटो पिकाची काढणी ३ ते ४ दिवसांनी करावी.
- उन्हाळी भेंडी पिकाची तोडणी एक दिवस आड करावी.
- गवार पिकाची काढणी करावी.
- वेलवर्गीय भाजीपाल्याची काढणी वेळेवर करावी.
- किड व रोगांचा प्रार्दुभाव आढळून आल्यास तज्ञांच्या सल्यानुसार नियंत्रणाचे उपाय करावेत.
- उन्हाळी टोमॅटो पिकास आधार द्यावा त्यासाठी ताटी पध्दतीचा अवलंब करावा.
- टोमॅटो पीक फुलोरा अवस्थेत असल्यास व तापमान ३५० सें.ग्रे. चे वर गेल्यास फुलगळ व कमी प्रमाणात फळधारणा होते.
- फुलगळ कमी करण्यासाठी व फळधारणेचे प्रमाण वाढवीण्यासाठी एन.ए.ए. या संजीवकाची व बोरॉन या सूक्ष्म अन्नद्रव्याची फवारणी करावी. तसेच टोमॅटोच्या शेताच्या चारही बाजूस व चार ओळीनंतर मक्याच्या दोन ओळी लावाव्यात.
- मिरची व वांगी पिकास खुरपणी करून नत्र खताचा हप्ता द्यावा.

### आले

- आले लागवडीसाठी एप्रिल महिन्यात बेणे खरेदी करावे व रासायनिक व जैविक बिजप्रक्रिया करुन बेणे सावलीच्या ठिकाणी साठवावे. मातृकंदापासून बियाण्याचे तुकडे वेगळे.
- जैविक बिजप्रक्रियेसाठी ॲझोस्पिरिलियम २५ ग्रॅम तसेच पी.एस.बी. २५ ग्रॅम प्रति लिटर पाणी वापरावे.

- लागवडीच्या वेळेपर्यंत या बियाण्याच्या वजनात घट होवून साठवणुकीच्या पध्दतीनुसार त्याचे वजन १५ ते १८ क्विंटल भरते.

### माती परिक्षण

- माती परिक्षणाचे महत्व: सर्वसाधारणपणे पिकास कर्ब, हायड्रोजन, प्रमाणवायु, नत्र, स्फुरद व पालाश या मुख्य अन्नद्रव्यांची, कॅल्शियम, मॅग्नेशियम, गंधक या दुय्यम अन्नद्रव्यांची तर लोह, मंगल, जस्त, तांबे, बोरॉन मॉलिन्डेनम या सुक्ष्म अन्नद्रव्यांची आवश्यकता असते. यापैकी नत्र, स्फुरद, गंधक, लोह व जस्त या सारख्या अन्नद्रव्यांची कमतरता आढळून आलेली आहे. खतांचा असमतोल वापर यापुढे याचपध्दतीने होत राहिला तर भविष्यात जमिनीचे आरोग्य बिघडणे आणि सुपिकता कमी होवून पिकांची उत्पादकता घटण्याबरोबरच निकृष्ट दर्जाची जमीन पुढील पिढीस हस्तांतरीत करण्याची नामुष्की आपणावर येण्याचा मोठा धोका आहे. यासाठी शेतकऱ्याने स्वत:च्या जमिनीचे माती परिक्षण करुन घेणे आणि त्याच्या तपासणी अहवालानुसार येणाऱ्या शिफारशी प्रमाणे खतांचा वापर करणे व जमिनीचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. त्यामुळे पीक उत्पादनांत वाढ होऊन खताच्या वापरावर होणारा अवाजवी खर्च कमी होणार आहे.
- मातीचा नमुना घेताना घ्यावयाची काळजी
- मातीचा नमुना घेण्यासाठी वापरात येणारी अवजारे उदा. फावडे, कुदळ, घमेले, खुरपी इत्यादी स्वच्छ असावीत.
- मातीचा नमुना पिके काढल्यानंतर परंतू नांगरणी पुर्वी घ्यावा. शक्यतो रब्बी पिकाच्या काढणीनंतर किंवा उन्हाळ्यात घेतल्यास पृथ:करण करुन परिक्षण अहवाला पेरणीपर्यंत उपलब्ध होतो.
- उभ्या पिकांखालील मातीचा नमुना घ्यावयाचा असेल तर दोन ओळीमधील मातीचा नमुना घ्यावा. परंतु पिकास रसायनिक खत दिले असल्यास तीन महिन्याच्या आत संबधित जमिनीतून माती नमुना घेवू नये.
- निरनिराळ्या जमिनीतील नमुना गोळा करताना वेगवेगळ्या मातीचे नमुने एकत्र मिसळू नयेत.
- माती नमुना गोळा करताना किंवा प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविताना रासायनिक खतांच्या रिकाम्या पिशव्यांचा वापर करु नये.
- शेतामधील खते साठविण्याची जागा, कचरा टाकण्याची जागा, जनावरे बसण्याची जागा, झाडाखालील जागा, विहिरीजवळ, पाण्याचे पाट व शेताचे बांध इत्यादी जागामधून किंवा जवळून मातीचे नमुने घेवू नयेत.
- मातीचा नमुना घेण्याची पध्दत
- मातीचा नमुना हा त्या शेतातील प्रातिनिधीक स्वरुपाचा असणे आवश्यक आहे. एक हेक्टर क्षेत्रातील १५ सेंमी खोलीपर्यंतच्या मातीचे वजन अंदाजे २२,४०,००० किलो ग्रॅम असते. यातून काढावा लागणारा ५०० ग्रॅम मातीचा नमुना प्रतीनिधीक होण्यासाठी किती काळजीपुर्वक घ्यावा लागेल याची कल्पना येते. कारण यामधून केवळ काही ग्रॅम माती तपासणीसाठी वापरली जाते व तिच्या तपासणीच्या निष्कर्षावर आधारित खताच्या शिफारशी केल्या जातात. म्हणून मातीचा नमुना काळजीपुर्वक काढावा.
- मातीचा नमुना काढण्यासाठी शेतात गेल्यानंतर प्रथम शेतीची पाहणी करावी व जमिनीच्या प्रकारानुसार वनस्पती/ पिकांचा रंग, वाढ भिन्न भिन्न असते, तसेच जमिनीच्या पृष्ठभागवरचा रंग देखील वेगवेगळा असतो. उतारवरील जमीन भुरकट रंगाची असते, सखल भागातील काळी असते म्हणूनच उतार रंग, पोत, खोली, व्यवस्थापन व पीक पध्दतीनुसार विभागणी करावी आणि प्रत्येक विभागातून स्वतंत्र्यरित्या वेगळा प्रातिनिधीक नमुना घ्यावा.
- एक सारख्या जमिनीतून नमुना घेताना काडी कचरा, गवत, पिकांची धसकटे व मुळे काढून टाका.
- जिथे पिकाची ओळीत पेरणी केली असेल अशा ठिकाणी दोन ओळीमधून नमुना घ्या.
- नुकतेच खते टाकलेल्या जमिनी खोलगट भाग, पाणथळ जागा, झाडाखालील जमीन, बांधजवळील जागा, शेणखताच्या ढिगाऱ्या जवळील जागा, शेतातील बांधकामा जवळील परिसर कंपोस्ट खताच्या जवळपासची जागा अशा ठिकाणातून मातीचा नमुना घेवू नका.
- सपाट पृष्ठभाग असलेल्या जमिनीवर इंग्रजी त अक्षराप्रमाणे १५ ते २० सेंमीचा खड्डा घेऊन आतील माती बाहेर काढून टाका. खड्डयाच्या सर्व बाजुची २ सेमी जाडीची माती खुरप्याच्या सहाय्याने वरपासून ते खालपर्यत खरडून हातावर काढा आणि प्लॅस्टीकच्या बादलीत टाका. अशारितीने एका प्रभागातून १० नमुने घेऊन त्याच बादलीत टाका.
- सर्व माती एका स्वच्छ प्लॅस्टीकच्या कागदावर टाका, चांगली मिसळा, ओली असल्यास सावलीत वाळवा नंतर ह्या ढिगाचे चार समान भाग करा. समोरासमोरील दोन भाग काढून टाका. उरलेले दोन भाग एकत्र मिसळा व पुन्हा चार भाग करा. हि प्रक्रिया एक किलो ग्रॅम माती शिल्लक राहीपर्यत करा.

मफुकृवि ई वार्ता
मार्च २०२४

वर्ष :४, अंक क्रं. : ३४, मार्च, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

### मातीचे नमुना कोठे व कसा पाठवावा

- मातीचे नमुना घेतल्यानंतर खालील माहिती लिहून ती, मातीचा नमुना असलेल्या पिशवीत टाकावी, मातीचा नमुना लवकरात लवकर जवळच्या शासकीय कृषि महाविद्यालये अथवा प्रमुख, मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभाग, मफुकृवि, राहुरी यांच्या माती परिक्षण योगशाळेत सशुल्क तपासण्यात येतील.

### स्मार्ट हवामान केंद्र (SWS)

- खेढ सक्षम स्मार्ट हवामान केंद्र (SWS) हवामानातील विविध घटकांचे (तापमान, आर्द्रता, वाऱ्याचा वेग, वाऱ्याची दिशा, पाऊस, सूर्यप्रकाशाचा कालावधी इ.) प्रत्यक्ष वेळेनुसार निरीक्षणे नोंदवतात व त्याचा उपयोग सिंचन, खत व्यवस्थापन व अचूक फवारणी यांसारख्या विविध कृषी कार्यांमध्ये होतो.
- खालील प्रकारचे स्मार्ट हवामान केंद्र (SWS) विकसित केले आहेत; SWS प्रकार १: पाऊस, SWS प्रकार २: तापमान, आर्द्रता, SWS प्रकार ३: तापमान, आर्द्रता व पाऊस, SWS प्रकार ४: तापमान, आर्द्रता, पाऊस, वाऱ्याचा वेग व वाऱ्याची दिशा, SWS प्रकार ५:तापमान, आर्द्रता,पाऊस, वाऱ्याचा वेग, वाऱ्याची दिशा व सूर्यप्रकाशाचे तास, SWS मिनी प्रकार १: तापमान, आर्द्रता, SWS मिनी प्रकार २: तापमान, आर्द्रता व पाऊस

### वैशिष्ट्ये

- प्रत्यक्ष वेळेनुसार हवामान घटकांची नोंदणी करण्यासाठी उपयुक्त
- प्रत्येक SWS hm QR कोडने नोंदविला जातो
- WiFi/ GSM²/ LoRa/ Bluetooth सारख्या कनेक्टिव्हिटी पर्यायांची विस्तृत श्रेणी
- नोंदवलेली हवामान माहिती एका निश्चित वेळेनंतर क्लाउड सर्व्हरला पाठवली जाते; क्लाउड सर्व्हरला पाठवलेली हवामानाची माहिती मोबाईल व वेब आधारित ॲपमध्ये पाहता, वापरता व डाऊनलोड करता येते
- सौर पॅनेलच्या व्यवस्थेसह जलरोधक आवरणाची रचना

**प्रकाशक** : **डॉ. चिदानंद पाटील**
संचालक, विस्तार शिक्षण
**प्रमुख संपादक** : **डॉ. पंडित खर्डे**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
**सहसंपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र
**श्री. सुनिल राजमाने**
कृषि सहाय्यक, प्रसारण केंद्र
**डिझाईनर** : **श्री. प्रदिप कोळपकर**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक-नि-टंकलेखक, प्रसारण केंद्र

**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र.२७२४/२०२४**